शनिवार, 06 ऑगस्ट 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 13
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 06 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-13 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-8 ● PRICE-5

## १४ महापालिकांच्या निवडणुका स्थगित

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्य सरकारने आगामी महापालिका; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील नगरसेवकांच्या (सदस्य) संख्येत बदल करण्याचा अध्यादेश प्रसिद्ध केल्यानंतर अवघ्या काही तासांतच राज्य निवडणूक आयोगाने सर्व निवडणूक प्रक्रिया स्थगित केली. पुणे महापालिकेनेही शुक्रवारी सकाळी इतर मागासवर्गीय आरक्षणाचा अध्यादेश प्रसिद्ध करण्यास स्थगिती दिली. 'राज्य निवडणूक आयोगाने आतापर्यंत केलेल्या प्रभाग रचना; तसेच आरक्षणाच्या सर्व प्रक्रिया रद्द केल्या आहेत आणि ही प्रक्रिया नव्याने सुरू करण्याची तरतूद केली आहे,' अशा स्पष्ट सूचना सर्व महापालिकांना दिल्या आहेत. आयोगाने दिलेल्या या आदेशांमुळे १४ महापालिकांची निवडणुकीची पूर्ण झालेली सर्व प्रक्रिया यामुळे रद्द झाली आहे. पुणे महापालिकेने 'ओबीसी' आरक्षणाची गेल्या आठवड्यात सोडत काढली होती. या सोडतीनुसार हरकती मागविण्यात आल्या होती. या हरकतींवर निर्णय घेऊन शुक्रवारी ओबीसी आरक्षणाचा अध्यादेश प्रसिद्ध करण्यात येणार होता. त्यासाठी योग्य ती माहिती येरवडा येथील शासकीय मुद्राणलयाला पाठविण्यात आली होती.

**निवडणूक स्थगित झालेल्या महापालिका**

मुंबई, ठाणे, उल्हासनगर, वसई-विरार, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, नाशिक, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि औरंगाबाद या महापालिकांवर प्रशासकाकडून कारभार पाहिला जात आहे. औरंगाबाद वगळता सर्व महापालिकांची निवडणुकीची तयारी पूर्ण झाली आहे. लातूर, परभणी, चंद्रपूर, मालेगाव, पनवेल, भिवंडी-निजामपूर, मीरा भायंदर आणि नांदेड वाघेला या महापालिकांच्या निवडणुकांची तयारी सुरू आहे.



जगप्रसिद्ध अजिंठा लेणीने हिरवा शालू पांघरला असून सध्या देश-विदेशातील पर्यटकांनी संख्या वाढली आहे.

# देशात लोकशाही संपुष्टात!

## केंद्र सरकार-भाजपविरोधात राहुल गांधींचा घणाघाती आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशातील लोकशाही संपुष्टात आली असून हुकूमशाहीच्या मार्गावर निघाला आहे. महागाई, बेरोजगारी हे लोकांशी निगडित विषय मांडून केंद्र वा भाजपच्या हुकूमशाहीला विरोध करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. त्यांच्यावर हल्लाबोल केला जातो, त्यांना अटक करून तुरुंगात डांबले जाते, असा घणाघाती शाब्दिक प्रहार काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला.**

गेल्या ७० वर्षांमध्ये झालेली देशबांधणी भाजप ८ वर्षांमध्ये संपवत आहे. इथे २-४ मोठे उद्योजक आणि २ नेत्यांचे राज्य आहे. देशातील लोकशाहीचा मृत्यू झालेला पाहून कसे वाटते? इथल्या हुकूमशाहीचा आनंद लुटत आहात की नाही?, अशी उपहासात्मक टिप्पणी राहुल यांनी पत्रकार परिषदेच्या सुरुवातीला केली.

लोकांचे प्रश्न विरोधक मांडण्याचा प्रयत्न करत असले तरी, केंद्र सरकार त्यावर चर्चा होऊ देत नाही. या दडपशाहीची मोठी किंमत भाजपला भोगावी लागेल, लोक शांत बसणार नाहीत. लोक जाब विचारतील याची भाजपला भीती वाटते. म्हणून भाजप विरोधकांना धमकी देतो. पण, धमकी देणारेच घाबरलेले असतात. त्यामुळे मी भाजपच्या दबावाला घाबरत नाही. पंतप्रधान मोदी मला भीती घालू शकत नाहीत, असे प्रत्युत्तर राहुल यांनी दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची राहुल गांधींनी हुकूमशहा हिटलरशी तुलना केली. हिटलरने देखील निवडणुका जिंकूनच देश ताब्यात घेतला होता. हिटलरने देशातील सर्व संस्था ताब्यात




घेऊन जर्मनीत हुकूमशाही राजवट आणली होती. इथेही देश हुकूमशाहीच्या मार्गाने जात आहे. लोकशाही घटनात्मक संस्थांच्या स्वायत्ततेवर चालते पण, इथे सर्व संस्था भाजप आणि संघाने ताब्यात घेतल्या आहेत, प्रत्येक संस्थेमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपली माणसे पेरली आहेत. 'ईडी', 'सीबीआय'सारख्या संस्थांच्या माध्यमातून देशात आर्थिक मक्तेदारी निर्माण झाली आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला.

### 'सीतारामन केवळ मुखवटा, त्यांना अर्थकारण कळत नाही'

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आकडेफेक करतात पण, त्यांना देशातील वास्तव माहिती नाही. सीतारामन निव्वळ मुखवटा आहेत. राज्या-राज्यांनी जीएसटीला विरोध केला होता. सीतारामन यांना अर्थकारणातील काहीही कळत नाही. महागाई, बेरोजगारी अस्तित्वात नाही, करोनामुळे लोकांचा मृत्यू झालेला नाही, चीनने घुसखोरी केलेली नाही, अशी दिशाभूल केली जाते. केंद्र सरकार आणि भाजप सातत्याने खोटे बोलतो. देशातील वास्तव आणि त्यांनी निर्माण केलेला भ्रम यामध्ये फरक आहे, अशी टीका राहुल यांनी केली.

## उपराष्ट्रपतीपदासाठी आज निवडणूक; 'रालोआ'चे उमेदवार धनखड यांचे पारडे जड

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशाच्या नवीन उपराष्ट्रपतींच्या निवडीसाठी शनिवारी मतदान होत आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) उमेदवार जगदीप धनखड आणि विरोधी पक्षाच्या संयुक्त उमेदवार मार्गारेट अल्वा यांच्यात लढत आहे. आकडेवारीचा विचार करता पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल धनखड यांचा विजय निश्चित दिसत आहे.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसने अल्वा यांच्या नावाच्या घोषणेपूर्वी एकमताचे प्रयत्न झाले नाहीत, असा दावा करून मतदान प्रक्रियेपासून दूर राहण्याची घोषणा केल्याने उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीवरून विरोधी पक्षांमध्येही मतभेद निर्माण झाले आहेत. ८० वर्षीय अल्वा या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या असून, त्यांनी राजस्थानचे राज्यपाल म्हणूनही काम पाहिले आहे. तेलंगणा राष्ट्र समिती, आम आदमी पार्टी आणि झारखंड मुक्ती मोर्चाने अल्वा यांना पाठिंबा जाहीर केला आहे. ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीननेही अल्वा यांना पाठिंबा दिला आहे.

धनखड ७१ वर्षांचे असून ते राजस्थानमधील प्रभावशाली जाट समाजाचे आहेत. संयुक्त जनता दल, वायएसआर काँग्रेस, बहुजन समाज पक्ष, अण्णा द्रमुक आणि शिवसेनेने धनखड यांना पाठिंबा जाहीर केला आहे आणि त्यांच्या समर्थनामुळे धनखड यांना सुमारे ५१५ मते मिळण्याची अपेक्षा आहे. अल्वा यांना आतापर्यंत मिळालेला पक्षांचा पाठिंबा पाहता त्यांना जवळपास २०० मते मिळतील, असा अंदाज आहे. अल्वा यांनी चित्रफीत संदेशात आवाहन केले, की संसदेचे कामकाज प्रभावी व्हायचे असेल, तर खासदारांना परस्पर विश्वास निर्माण करण्यासाठी आणि संवाद पुन्हा सुरू करण्याचे मार्ग शोधावे लागतील. खासदारच आपल्या संसदेचे चारित्र्य ठरवतात. एम व्यंकय्या नायडू यांचा उपराष्ट्रपती म्हणून कार्यकाळ १० ऑगस्ट रोजी संपत असून, नवे उपराष्ट्रपती ११ ऑगस्ट रोजी शपथ घेतील. लोकसभा आणि राज्यसभेच्या सर्व सदस्यांसह नामनिर्देशित सदस्य या निवडीसाठी मतदान करण्यास पात्र असतात. अल्वा यांना पाठिंबा देणाऱ्या सर्व पक्षांच्या खासदारांसाठी राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी गुरुवारी रात्रीच्या जेवणाचे आयोजन केले होते. धनखड यांनी शुक्रवारी त्यांच्या निवासस्थानी भाजप खासदारांची भेट घेतली. संसद भवनात शनिवारी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत मतदान होणार आहे. त्यानंतर लगेचच मतमोजणी होणार असून, संध्याकाळी उशिरापर्यंत देशाच्या नव्या उपराष्ट्रपतींच्या नावाची घोषणा निवडणूक अधिकाऱ्यांकडून केली जाईल.


## गृहकर्जे, वाहनकर्जे महागणार; व्याजदरांमध्ये आरबीआयकडून अर्ध्या टक्क्याची वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी रेपो रेटमध्ये अर्ध्या टक्क्याची वाढ केली आहे. त्यामुळे रेपो रेट ५.४ टक्के इतका झाला आहे. शुक्रवारी झालेल्या पतधोरण समितीच्या बैठकीमध्ये २०२२-२३ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची किंवा जीडीपीची वाढ ७.२ टक्के राहील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत जीडीपीची वाढ १६.२ टक्के, दुसऱ्या तिमाहीत ६.२ टक्के, तिसऱ्या तिमाहीत ४.१ टक्के आणि चौथ्या तिमाहीत ४ ते ४.१ टक्के अशी असेल. पुढील आर्थिक वर्षात म्हणजे २०२३-२४ मध्ये प्रत्यक्ष जीडीपी वाढ ६.७ टक्के असेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

भारतीय अर्थव्यवस्था महागाईशी झुंज देत असून गेल्या काही महिन्यांमध्ये भारतातून १३.३ अब्ज डॉलर्स इतके भांडवल बाहेर गेले असल्याचेही आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितले. परंतु, भारतीय अर्थव्यवस्थेत पुरेसे भांडवल खेळते असून जागतिक अर्थव्यवस्थेतील धक्क्यांना पचवू शकेल एवढे परकीय चलनही भारताकडे असल्याचे दास म्हणाले.

भारतीय बँकांना दैनंदिन व्यवहारांसाठी निधीची गरज असते. ही गरज पूर्ण करण्यासाठी रिझर्व्ह बँक देशातील बँकांना अल्प मुदतीचे कर्ज देते. या अल्प मुदतीच्या कर्जावर जो व्याजदर आकारला जातो त्याला रेपो रेट म्हणतात. रिझर्व्ह बँकेकडून रेपो रेटमध्ये कपात झाल्यास बँकांना मध्यवर्ती बँकेकडून कमी दराने कर्ज मिळते. परिणामी बँका आपल्या ग्राहकांना कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देतात. या उलट रेपो दरात वाढ झाल्यास बँकांना ज्यादा दराने कर्ज मिळत असल्याने बँकाकडून ग्राहकांना देण्यात येणाऱ्या कर्जांचे दर वाढतात. याउलट बँकांकडे अतिरिक्त निधी असेल तर बँका हा निधी रिझर्व्ह बँकेकडे जमा करतात. या ठेवींवर जे व्याज मिळते त्याला रिव्हर्स रेपो रेट म्हणतात.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## जो हुकूम मेरे आका...

आधुनिक केसरी

किसीसे चॅट करना चाहो तो कर सकोगे. और भी बहुत कुछ हैं, आजमाके तो देखिये जनाब. ' आणि काय आश्चर्य त्याच्या बोलण्याची मला भुरळ पडली. व्हाट्सअपने मला पुरते वेड लावले.
आता जीन मला आणखी नवनवीन रूपे दाखवत राहिला. मी वेड्यासारखा त्याच्या मागे जात राहिलो. फेसबुक दाखवलं. म्हटलं ' अरे वा, जगच जवळ आलं की. निरनिराळे मित्र, मैत्रिणी. त्यांचे रोजचे नवीन उद्योग. सगळं काही कळू लागलं. यु ट्यूब नावाचं आणखी एक वेगळी दुनिया दाखवली. सगळ्या प्रकारचे व्हिडीओ. गाण्याचे, खाण्याचे, नाचण्याचे, याचे अन त्याचे.. तुम्ही फक्त नाव सांगा. व्हिडिओ हजर. म्हटलं ' यार, काय ग्रेट आहे हे सगळं. तो उभाच होता समोर म्हणायला, ' जो हुकूम मेरे आका. ' आतापर्यंत 'आकाला कोणी हिंग लावून विचारत नव्हतं. तू तर काय दुनियाच बदलून टाकलीस मित्रा. तो म्हणाला, ' हे तर काहीच नाही. माझ्या पोतडीत खूप काही आहे. चल तुला आणखी एक माझे रूप दाखवतो. मग गुगलचे रूप घेऊन तो प्रकट झाला. आता तर मला जणू महाभारतात अर्जुनाला विश्वदर्शन घडवणाऱ्या श्रीकृष्णाची आठवण झाली. तो होताच तसा. ' अमुक एक हवं ' म्हटलं की विविध पर्यायांसह हजर. कमाल झाली यार. सिम्पली ग्रेट ! ' दुनिया मेरी मुठ्ठीमे. मग जग जवळ आलं आहे. द वर्ल्ड इज या ग्लोबल व्हिलेज. ज्ञानाचा विस्फोट यासारखे निरनिराळे शब्द, वाक्य मला आपोआप आठवू लागले. या विश्वरूपदर्शनासमोर मी नतमस्तक झालो.
मी भानावर येत नाही तोपर्यंत त्याच्या हास्याचा गडगडाट कानावर आला. ' पाहिलंस ना ! तुझ्या सगळ्या इच्छा पूर्ण होणार. तुला हवं ते मिळणार. तू फक्त हुकूम करायचास. ' मी म्हणालो, ' तू तर खरंच ग्रेट आहेस यार. पण एक सांग खरंखरं ! ' ' जो हुकूम मेरे आका...' तो तत्परतेने उत्तरला. मी म्हणालो, ' मला माझा गेलेला वेळ देऊ शकशील का ? ' तो हात जोडून म्हणाला, ' ये मेरे बस की बात नही मेरे आका. ' मी म्हटलं, ' ठीक आहे रे. तू मला माझे आरोग्य परत मिळवून देऊ शकतोस का ? ' तो पुन्हा अवघडून म्हणाला, ' मेरे आका, ये मैं नही कर सकता. ' मग मी त्याला विचारत राहिलो की तू हे करशील का, ते करशील का ? तो आपला गयावया करत नाही नाही म्हणत होता.

(क्रमशः)



## आनंदी पहाट

## आवाजाची पातळी सांभाळावी

आधुनिक केसरी

कार्यक्रम कोणताही असोत, स्पीकर्सच्या भिंती आणि कर्णकर्कश आवाज हा पाहिजेच. काहीवेळा तर हेच कळत नाही कि, कार्यक्रमासाठी ह्या स्पीकर्सच्या भिंती उभ्या केल्या जातात कि, स्पीकर्सच्या भिंतीसाठी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. सत्यनारायणाची पूजा असेल, लग्न समारंभ असेल, मिरवणुक अथवा वरात असेल, कोणताही धार्मिक उत्सव अथवा जयंतीनिमित्तचा एखादा कार्यक्रम असेल; स्पीकर्सच्या भिंती उभ्या केल्याशिवाय आणि आवाजाची पातळी ओलांडल्याशिवाय कार्यक्रम झाल्यासारखाच वाटत नाही; अशा अविर्भावात असणाऱ्यांच्या कोणत्या जाणीवा शिल्लक राहिलेल्या असतात, हाच कळीचा मुद्दा आहे. त्यांतही त्यावर वाजवली जाणारी गाणी आणि एकूणच त्यांचे संगीत हा तर निराळाच विषय आहे. स्पीकर्सच्या भिंतीतून निघणारा कर्णकर्कश आवाज मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या अपायकारक असल्याचे अनेकदा माननीय न्यायालयाने देखील बजावल्याचे आपल्या प्रत्येकाला ज्ञात आहेच. अर्थात हे सर्व लोकांकडून मिळवलेल्या वर्गणीतून केले जाते तेव्हा तर तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्याशिवाय गत्यंतर नसते. अशांतता पसरवणाऱ्या ह्या स्पीकर्सच्या भिंतीचा स्वीकार आणि अंगीकार करणाऱ्यांच्या उणिवा त्यांना दाखवून देणे म्हणजे मांजरीच्या गळ्यांत घंटा बांधण्यासारखेच असते. ह्याचे एकूणच होणारे दुष्परिणाम समजून घ्यायच्या मनस्थितीत अशावेळेस असणारे किती जण असल्याचे दिसते. शाळा, कॉलेजमध्ये, हॉस्पिटलमध्ये, वर्दळीच्या ठिकाणी, बँकेत, सरकारी कार्यालयांत, धर्मस्थळांमध्ये जिथे शांततेची जरुरी असते, अशाही अनेक ठिकाणी ह्या कर्णकर्कश आवाजात लावलेल्या गाण्यांचा आणि स्पीकर्सच्या वापराचा आणि त्याच्या विविध प्रकारच्या आवाजाच्या पातळीचा इतरांना किती त्रास होत असतो, ह्याची साधी जाणीवही होत नसते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### जन्माचा निवारा

कोणत्याच गावी | मिळेना विसावा ||
थकलो मी देवा | संसारी या ||१||

दुरावले सारे | मला न कळाले ||
हातचे पळाले | हसोनिया ||२||

संचिताचे भोग | वंचिताचे जीणे ||
एकटे सोसने | भोग सारे ||३||

पाऊली खेळते | श्वासाची मंजिरी ||
जीव हा पंढरी | भासे मज ||४||

पुण्य फळा आले | शीण सारा गेला ||
आता न उरला | किंतु मनी ||५||

मिळाला मिळाला | आता मज थारा ||
जन्माचा निवारा | तुझ्या पायी ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी


**जगन्मातर्मातस्तव चरणसेवा न रचिता**
**न वा दत्तं देवि द्रविणमपि भूयस्तव मया।**
**तथापि त्वं स्नेहं मयि निरुपमं यत्प्रकुरुषे**
**कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ॥४॥**

जगदंबे माते ! मी कधी तुझी चरणसेवा केली नाही. तुला कधी जास्त धन समर्पित केले नाही, तरीही माझ्यासारख्या पामरावर तुझे अतुलनीय प्रेम असेल, तर त्याचे कारण म्हणजे मुलगा कुपुत्र होऊ शकतो, पण माता ही कुमाता होऊ शकत नाही. || ४ ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## || दासबोध स्तवन ||



## मायाब्रह्मनिरूपण

आधुनिक केसरी

अनंत नामरूपानी भरलेले हे चराचर विश्व त्याला पलब्रम्हाची "स्वानंदलीलाच"वाटते. मायेच्या प्रभावाने फसून जाऊन तो आत्मस्वरूपाला विसरत नाही आणि द्रुश्याला खरेपणा देत नाही. परंतु मायेच्या आधीन होऊन अज्ञानामध्ये जगणारा जीव स्थलकालाच्या बंधनात अडकतो. त्यामुळे आत्मस्वरूप तो विसरतोच पण त्याचबरोबर चराचर विश्व संपूर्ण सत्य मानतो. आत्मज्ञानाच्या द्रुष्टीने विचार केला तर ब्रम्ह आणि त्याची शक्ति माया दोन्ही अगदी एकरूपचं आहेत. ऊलट अज्ञानाच्या भूमिकेतून पाहिले तर ब्रम्ह आणि माया वेगवेगळी वाटतात. म्हणून मानवी बुध्दी च्या पध्दतीने ज्ञानमय ब्रम्ह आणि अज्ञान मय माया यांची तुलना करता येते. या "मायाब्रम्ह निरूपण" समासात समर्थांनी त्याची परस्परविरोधी लक्षणे सांगितली आहेत.
द्रुश्य विश्वाच्या सगळ्या बंधनाच्या, सीमांच्या पलीकडे परमात्मा निराळे पणाने रहातो. आकाशाचे प्रतिबिंब पाण्यात पडले तरी आकाश पाण्यापासून अलिप्त असते,तसाच परमात्मा सर्वात व्यापलेला असून अलिप्त असतो.
आपण सगळी मर्त्य माणसं आहोत. मित्रांनो मानव जन्म एकदाच मिळतो तेव्हा तेव्हा संतांनी घालून दिलेल्या आदर्श जीवन पध्दतीने जगून म्हणजेच कोणत्याही प्रकारचा "अतिलोभ"न धरता जीवन जगावे व शेवटी मोक्षास पात्र व्हावे हाच तर संतांचा विचार आपण अंगात रूजवला पाहिजे व मोक्षास पात्र झाले पाहिजे.



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## वासनेला कसे जिंकता येईल?

आधुनिक केसरी

कितीही विद्वान पंडित जरी झाला तरी त्याला स्वतःला अनुभव आल्यावाचून ज्ञान सार्थकी लागले असे होत नाही. पोथी ऐकून ज्याला वैराग्य आले त्यालाच पोथी खरी कळली असे म्हणावे. पोथीत सांगितलेले ऐकून ते जो आचरणात आणतो तोच खरा श्रोता होय. वेदांत हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे, तर त्याचा उपयोग. म्हणूनच सर्व प्रचीतींमध्ये आत्मप्रचीती ही उत्तम होय. जो भगवंताला शरण गेला त्याच्यापाशी शब्दज्ञान नसले तरी, त्याला मिळवायचे काहीच उरत नाही. जो शब्दज्ञानाच्या मागे जातो त्याचा अभिमान बळावतो. जो शब्दज्ञानी नसतो त्याला अभिमान नसेलच असे नाही. अज्ञानी माणसालाही अभिमान असतो, परंतु तो घालविणे सोपे असते. 'सद्गुरूला शरण जा' म्हटले, तर अज्ञानी माणूस मुकाट्याने शरण जाईल, त्याला शंका येणार नाही.
काशीला जाणारे पुष्कळ रस्ते आहेत; पण कोणत्याही रस्त्याने जायचे तरी आपले घर सोडल्याशिवाय जाता येत नाही. हे जसे खरे, तसे कोणत्याही साधनात वासना बाळगून, किंवा ती देवापासून निराळी ठेवून भागणार नाही. ती देवाची करायला, तिला मारायला, देवाचे स्मरण पाहिजे.



भगवंताचे होणे हे माझे या जन्मातले मुख्य काम आहे असे समजावे. मी भगवंताचा कसा होईन याचा सारखा रात्रंदिवस विचार करावा. मी दुसऱ्या कोणाचा नाही ही खात्री असली म्हणजे भगवंताचे होता येते. आपले मन वासनेच्या अधीन होऊन तात्पुरत्या सुखाच्या मागे गेल्यामुळे थप्पड खाऊन परत येते. लोक समजतात तितके वासनेला जिंकणे कठीण नाही. आपली वासना कुठे गुंतते ते पाहावे. आपल्या अंगातले रक्त काढून ते तपासून, आपल्याला कोणता रोग झाला आहे हे डॉक्टर पाहातात, त्याचप्रमाणे आपले चित्त कुठे गुंतले आहे हे आपण पाहावे; तो आपला रोग आहे. जी गोष्ट आपल्या हातात नाही तिच्याविषयी वासना करणे वेडेपणाचे आहे, हे ध्यानात ठेवावे. म्हणूनच विचार आणि नाम यांनी वासनेला खात्रीने जिंकता येईल. मग आपले कर्तेपण आपोआप मरून जाईल. हिमालयावर ज्या वेळी आकाशातुन बर्फ पडते त्या वेळी ते अगदी भुसभुशीत असते, पण ते पडल्यावर काही काळाने दगडापेक्षाही घट्ट बनते. त्याचप्रमाणे, वासनाही सूक्ष्म आणि लवचिक आहे, पण आपण तिला देहबुद्धीने अगदी घट्ट बनवून टाकतो. मग ती काढणे फार कठीण जाते. भगवंताची वासना ही वासना होऊच शकत नाही. ज्याप्रमाणे कणीक अनेक वेळा चाळून गव्हाचे सत्व काढतात, त्याप्रमाणे विषयाची सर्व वासना नाहीशी झाल्यावर जी उरते, ती भगवंताचि वासना होय.
आजचे बोधवचन : वासना मारायला भगवंताचे अधिष्ठान हा एकच उपाय होय.

**-श्रीसद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

मनोजवं मारुततुल्यवेगमं
जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# प्रधान सचिव साहेब आता बीडमधील त्या जुगारी शिक्षकांच्या प्रकरणात तुम्हालाच लक्ष घालावे लागेल...!

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**बीड :** प्रधान सचिव साहेब या वर्षात बीड मधे शिक्षकी पेशाला काळीमा फासणारी एक अनुच्छेद घटना घडते काय आणि त्या घटनेतील आरोपींना पाठीशी घालण्यासाठी या जिल्ह्यातील काही स्थानिक नेते मंडळी आटापिटा करते तर दुस-या बाजुने दुसरी मंडळी हे प्रकरण आणखीनच कसे चिघळेल यात गुंतलेले असतात. ऐवढेच नाही तर बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार तर पुढे अप्पर विभागीय आयुक्तांवरती दबाव आणण्याचा प्रयत्न केला जातो हे लक्षवेधी आहे. परंतु या दोन्ही अधिकाऱ्यांनी कुठल्याही प्रकारच्या दबावाला न जुमानता त्या जुगारी शिक्षकांच्या विरोधात शासन निर्णयानुसार निर्णय घेत आणि भविष्यात या अशा जुगारी-व्यसनी शिक्षकांच्या हाताने देशाचे भविष्य असणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय होऊ नये म्हणून या अशा शिक्षकी पेशाला काळीमा फासणाऱ्या शिक्षकांवरती निलंबन, चौकशी, ससेमेरा लावेत थेट अशांना घरी बसवण्याचे धाडस करतात आणि मग या धाडसाच्या विरोधात हे जुगारी पाडस राजकीय वरदहस्ताने आणि जि.प.ची सातत्याने बदनामी झाली, तिला गालबोट लागेल तरी आपले खळगे कसे भरेल याची पुरेपूर काळजी घेणारे भालदार-चोपदार कक्षाधिकारी जयलाल राजपूत आणि पी.बी. आर्सुळ यांच्या सहकार्याच्या जोरावर अल्पावधीतच चोरावर मोर होण्यासाठी मंत्रालयात अपील काय दाखल करतात आणि मग अप्पर सचिव विजय चांदेकर व राज्यमंत्री अब्दुल सत्तार हे IAS अधिकाऱ्याचा निर्णय अयोग्य ठरवून ऐका सुनावणी अधिका-याने थातुरमातुर मांडलेल्या-केलेल्या अरसुळ पी.बी. यांच्या माध्यमातून केलेल्या किळसवाण्या प्रकरणावर कायमस्वरुपी पडदा टाकण्यासाठी सीईओनी ठेवलेला ठपका कसा पुसता येईल याची पुरेपूर काळजी घेत आख्खा निर्णयच पलटवून टाकत आपल्या अधिकाराचा गैरफायदा घेताना IAS-IPS अधिकारी हे पण कसे चुकीचे असू शकतात यासाठी अभ्यासपूर्वक निर्णय देऊन वरतून जाणीवपुर्वक त्या तिन्ही जुगारी-व्यसनी शिक्षकांना हवे त्या ठिकाणीच मूळ जागीच पदस्थापना देऊन पुन्हा काहीच घडले नाही अशा वातावरणात नव्या पर्वाची सुरुवात करतात. हे घडलेल प्रकरण सार कस नाट्यमयरित्या अगदी सहजपणे दडपून टाकतात. मग हे असं लाजिरवाणं काम करताना या अशा तथा शिक्षण विभागाचे वाटोळ करणाऱ्या शिक्षकांच्या पाठीशी हे राजकारणी असतील वा जिल्हा परिषदेतील काही निवडक कर्मचारी-अधिकारी असतील ते थोड्याशा पैशासाठी भावी कित्येक पिढ्यांचे काय होऊ शकते याचा तीळमात्र विचार न करता चांगल्यासोबत राहण्याऐवजी वंगळ्यांसोबत गाठी बांधून आपल्या कोठ्या भरून घेण्याचे काम करतात हे न उलगडणारे कोडे म्हणजे ऐक नवलच......!






**मंत्रालयात अधिकाऱ्यांच्या निर्णयाची गय नाही**
**काही अप्पर सचिव-मंत्री यांच्या कामात लय नाही**
**बीड जि.प.तील काही निवडक मोकाटांना तर कुणाचेच भीव नाही**
**मग जुगारी-व्यसनी शिक्षकांकडून तर उलटसुलट करण्यात हायगयच नाही**

प्रधान सचिव साहेब येथे एखाद्या शिक्षकाकडून वा कर्मचाऱ्याकडून साधा जरी गुन्हा घडला तरी त्यास तात्काळ निलंबन केले जाते. त्याची चौकशी लावली जाते. वेळप्रसंगी गरज नसताना त्याला सक्तीची सेवानिवृत्ती दिली जाते. त्याच बीड जिल्ह्यात खरोखर केलेला गुन्हा पाठीशी घालत उलट अशा ठग-महाशयांचे आरोप अंगावर घेऊन पोलीस प्रशासनातील पंकज कुमावतांसारखे कर्तव्यदक्ष आय.पी.एस.(IPS) अधिकारी आणि अजित पवारांसारखे कार्यतत्पर सीईओ IAS अधिकारी अगदी विचारपूर्वक निर्णय घेत भविष्याचा वेध घेऊन जेंव्हा ऐखादी कारवाई करतात. तेंव्हा त्या मागील उद्देश, दुरदृष्टी न समजुन घेता केवळ आपले उखळ पांढरे करण्यासाठी काही पांढरपेशी मंडळी अशा पद्धतीने वागत असेल तर यांना आता कोण जाब विचारणार.....?? आता यांना जाब विचारू शकणारे केवळ आपण आहात. प्रधान सचिव साहेब आपणाकडे ही तक्रार पोहचली असेलच. नसेल तर दोन-चार दिवसात पोहोचेलच. तेंव्हा या अशा समाजविघातक व्यक्ती आणि प्रवृत्ती जर मुळासकट हाणून पाडायच्या असतील तर साहेब अशा प्रकरणांमध्ये आपण अगदी खोलपर्यंत जाऊन सखोल चौकशी करून पुन्हा नव्याने फेर निर्णय घेणे केवळ शिक्षण विभागाच्या किंवा समाजाच्या नाही तर सबंध महाराष्ट्राच्या हिताचे ठरेल. तेंव्हा मोठ्या अपेक्षा ने बीड जिल्हावाशी आणि आम्ही आशावादी पालक आपणाकडून अशा जुगारी व्यसनी शिक्षकांना आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या रक्षकांना-भक्षकांना आपण चांगलाच धडा शिकवाल. या अपेक्षेनेच आता ही तक्रार आणि बीड जिल्ह्यातील अनागोंदी कारभाराची बातमी आपणापर्यंत पोहोचवण्याच काम दै.आधुनिक केसरी सामाजिक दायित्वरुपी करत आहे.....!!

# भोकर शहरातील पथदिव्यांची दूरावस्था

## नगर पालिकेचे दुर्लक्ष, निधी कुणाच्या घशात



आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील नगरपालीकेनी शहरात जागोजागी पथदिव्यांची व्यवस्था केली आहे. मागील अनेक दिवसांपासून याकडे गांभीर्याने बघीतल जात नाही. शहरातील बहुतांश पथदिवे बंद अवस्थेत असून बोटावर मोजण्या इतके दिवे लागलेले असतात परिणामी मुख्य रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. पथदिवे केवळ नावालाच असल्याचे दिसून येते आहे. यासाठी आलेला नीधी कुणाच्या घशात जातो आहे. नगर पालीका मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शहरात प्रारंभी ग्रामपंचायत असताना विजेच्या बाबतीत मागासलेपणा होता आता मात्र पालीका झाल्याने वीजेसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध होतो आहे. शहरातील मुख्य रस्त्यावरील दुभाजकात विजेची खांबे उभारण्यात आली आहेत. तर मूख्य चौकातील खांबावर अधिक पावरचे हालोजन लावण्यात आले आहेत. सूरवातीला या कामात हलक्या प्रतीचे साहित्य वापरून लाखो रूपयांचा घोटाळा केल्याच्या तक्रारी झाल्या पण कार्यवाही काहिच झाली नाही. दरम्यान पालीकेनी सदरील वीजपुरवठा करण्यासाठी खासगी कंत्राटदारांकडे जबाबदारी सोपवून मोकळे झाले आहे. आता मात्र येथील वीजेच्या देखभाल दुरुस्तीसाठी कुणीच वाली नाही स्वताह पालीकाच याची देखभाल दुरुस्ती करते आहे. संबधीत कंत्राटदारांला काम का देण्यात आले नाही याची माहिती मिळु शकली नाही. पालीकेच्या हलगर्जीपणामुळे पथदिव्यांचा वीजपुरवठा सूरळीत होत नाही.

शहरातील दूभाजकात असलेले बहूतांशी पथदिवे बंदच आहेत. मोजक्याच ठिकाणी दिवे लागलेले असतात. मुख्य रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. वाहनाची नेहमी तोबा गर्दी असते त्यामुळे मोठा अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. येथील आंबेडकर चौक, शिवाजी चौक आणि म्हैसा रस्त्यावरील चौकात मोठे खांब उभारून अधीक क्षमतेचे हालोजन बसवीण्यात आले आहेत. कधी चालू तर कधी बंद अशी दयनीय अवस्था झाली आहे.

**निधी कुणाच्या घशात**

शहरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी पूर्वी कंत्राटदाराकडे जबाबदारी सोपविण्यात आली होती. आता मात्र स्वताह पालीकेनी जबाबदारी घेतली आहे. देखभाल दूरूस्ती करण्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिला जातो. पालीकेच्या हलगर्जीपणामुळे पथदिवे नावालाच असून यासाठी मिळालेला निधी कुणाच्या घशात जातो आहे हे मात्र अनाकलनीय आहे. संबधीतानी त्वरीत याकडे लक्ष देऊन नागरीकाची होणारी गैरसोय दूर करावी अशी जनतेची मागणी आहे.

# भ्रष्टाचार रोखण्यासाठी भ्रष्टाचाराविरोधी संघात सहभागी व्हा : ॲड.मोरे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राज्य शासनाने भ्रष्टाचाराचा बिमोड करण्यासाठी तक्रारदाराचे नाव गुप्त ठेवत दोन लाखाचे बक्षीस देण्याची योजनाही आणली आहे. तक्रार करणाऱ्या नागरिकाला भ्रष्टाचार विरोधी संघ योग्य ती मदत आणि सहकार्य करील त्यामुळे जनतेने आपला संघात सहभाग नोंदवावा असे आवाहन ॲड. कृष्णा मोरे आणि संघ प्रमुख किरण नगराळे यांनी केले आहे.

धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या भवनात घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ॲड. मोरे म्हणाले की, राज्य शासनात कार्यरत असेलेले अधिकारी व कर्मचारी यांची भ्रष्टचारात ईतकी मुजोरी वाढली आहे कि, ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यावर भ्रष्टचाराचा गुन्हा दाखल केला गेला आहे व न्यायालयाचा त्याच्यावर आदेश असून सुद्धा संबधीत अधिकारी किंवा कर्मचारी बडतर्फ होत नाही. न्यायालयाने शिक्षा सुनावल्या नंतर देखील वरिष्ठ स्तरावरील अधिकारी संबधीत आरोप सिद्ध झालेल्या व्यक्तीला बडतर्फ करीत नाही, असे पहाणीत दिसत आहे. जर असे सुरुच राहत असेल तर, आता जनतेला ह्या बाबत पुढे यावे लागेल व पुढाकार घेऊन महाराष्ट्र राज्य सरकारला सहकार्य करावे लागेल, सामान्य नागरिकाला प्रश्न पडतो, कि आपण भ्रष्टचार संपण्यासाठी काय करू शकतो, त्याला हे शकय आहे का ? आणि भ्रष्टचारची माहिती दिल्यास सामान्य नागरिकाला ह्याचा काय फायदा ? ह्या सर्व प्रश्नाचे उत्तर आहे -भ्रष्टाचार विरोधी संघ-महाराष्ट्र राज्य, ह्या संघात सामान्य नागरिकाने सामील व्हावे, असे आवाहन आम्ही सर्व जनतेला करीत आहोत.



# महागाईचे सूर कठोरच!

आधुनिक केसरी

रिझर्व्ह बँकेच्या तीन दिवस चाललेल्या दर-निर्धारण समिती अर्थात 'एमपीसी'च्या बैठकीतून शुक्रवारी असा निर्णय येणे अपेक्षितच असले तरी, तो ३५ ते ५० आधारबिंदू या अपेक्षित मात्रेच्या वरचे टोक गाठणारा ठरला आहे. अर्थात 'अर्धा टक्के रेपो दर वाढ ही आजच्या जागतिक वातावरण सामान्यच ठरते,' असे म्हणत रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी या सलग तिसऱ्यांदा केल्या गेलेल्या व्याजदरातील वाढीचे समर्थनही केले. बँकांकडून कर्जे महागण्यास कारणीभूत ठरणाऱ्या रेपो दरात चालू वर्षात मे महिन्यापासून झालेल्या या तिसऱ्या वाढीने, तो दर आता ५.४० टक्क्यांवर गेला आहे. म्हणजे करोनापूर्व ५.१५ टक्क्यांच्या पातळीच्या तो पुढे गेला असून, ऑगस्ट २०१९ नंतरचा त्यांचा उच्चांकी स्तर आहे. एमपीसीच्या या बैठकीतून दिले गेलेले नेमके संकेत कोणते? अर्थात जागतिक स्तरावर सर्वत्रच मध्यवर्ती बँकांकडून ज्या कारणाने व्याजाचे दर आक्रमकपणे वाढविले जात आहेत, त्याच कारणासाठी अर्थात महागाईला काबूत आणण्यासाठी व्याजाचे दर वाढविण्याचा निर्णय या बैठकीत दर-निर्धारण समितीने (एमपीसी) संपूर्ण एकमताने घेतल्याचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी स्पष्ट केले. तथापि पुन्हा थेट अर्धा टक्क्याची दरवाढ करण्यामागे त्यांनी खुलासेवार विवेचन पत्रकार परिषदेत केले. जगभरात मध्यवर्ती बँकांकडून व्याजदर वाढ ही यापेक्षा अधिक प्रमाणात म्हणजे एक टक्का, पाऊण टक्का मात्रेने होत आहे. त्या तुलनेत अर्धा टक्का दरवाढ ही 'सामान्य'च ठरते. गुरुवारीच बँक ऑफ इंग्लंडने १९९५ नंतर प्रथमच केलेल्या अर्धा टक्के दरवाढीचा संदर्भही गव्हर्नर दास यांनी या प्रसंगी दिला. चालू वर्षात तिसऱ्या तिमाहींपर्यंत म्हणजेच डिसेंबर २०२० अखेरपर्यंत ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर हा सहा टक्के अर्थातच समाधान पातळीपेक्षा जास्तच राहिल, हेच पूर्वअंदाजित भाकित या बैठकीअंती देखील रिझर्व्ह बँकेने कायम ठेवले. तर जानेवारी ते मार्च २०२३ या चौथ्या तिमाहीत तो ५.८ टक्क्यांपर्यंत ओसरताना दिसेल, हा तिचा कयास आहे. तथापि भारताकडून आयात होणाऱ्या अनेक जिनसांच्या किमती मधल्या काळात नरमल्या आहेत. महागाई दरासंबंधीच्या भाकितात, मध्यवर्ती बँकेने खनिज तेलाची किंमत ही पिंपामागे सरासरी १०५ डॉलर राहील, असे गृहित धरले आहे. प्रत्यक्षात गेला महिनाभर ती १०० डॉलर व त्यापेक्षा खाली आणि गुरुवारी तर पिंपामागे ९४ डॉलरवर होती. शिवाय, सरकार तसेच रिझर्व्ह बँकेने महागाईवर नियंत्रणासाठी योजलेल्या उपायांचे इच्छित परिणामही हळूहळू दिसून येत आहेत, याकडे गव्हर्नर दास यांनी लक्ष वेधले. त्यामुळे महागाईदरासंबंधीचे अनुमानही पुढील काळात बदलू शकते, असेही त्यांनी सूचित केले. तथापि, देशांतर्गत वस्तू व सेवांच्या किमतीवर परिणाम करणारे घटक हे बाह्य असल्याने आणि हा महागाईचा घाला 'आयातीत' असल्याने त्यावर नियंत्रणाची आयुधेही मर्यादित असल्याची कबुलीही त्यांनी दिली.

# रामायण महाभारतातील मैत्रीचे संदर्भ



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**भारतीय संस्कृतीमध्ये मैत्री हया नात्याला एक विलक्षण आणि अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणारे दोन महाकाव्य म्हणजे रामायण आणि महाभारत, हे दोन्ही ग्रंथ म्हणजे एक प्रकारचे जीवनदर्शन आहे यात शंका नाही. रामायणामध्ये आदर्श जीवनाचा परिपाठ तर महाभारतामध्ये नात्यातील शह कटशह आणि प्रतिशोध यांचे राजकारण दिसते.राम लक्ष्मण सीता ह्यांनी रामायणात आपल्या वनातील पहिली रात्र रामाचा मित्र निषादराजा गुह ह्यांच्या कडे व्यथित केल्याचा उल्लेख दिसून येतो.**

अडचणीच्या काळात रामाला मित्राचा आश्रय घ्यावा असे वाटले ह्यातून त्याचा मैत्रीच्या नात्याचा आदर दिसून येतो. त्यानंतर निषाद राजाने केवटाच्या मदतीने रामाला नदी पार करविली असा संदर्भ दिला आहे. पुढे सीता हरण झाल्यावर वानर राज सुग्रीव आणि रामच्या मैत्रीचा संदर्भ येतो पण खरे तर तो एक व्यवहार होता, रामाने वालीला मारावे आणि सुग्रीव सेनेने रावणाविरुद्ध रामाला साथ द्यावी असा तो करार होता. मात्र सुग्रीवसेनेचा एक मुख्य शिलेदार हनुमान हा रामाचा भक्त, मित्र सखा म्हणून कायम लक्षात राहिला. लंकेत जाऊन सीतेचा शोध घेणे, रामाचा जीव की प्राण असलेल्या लक्ष्मणा साठी संजीवनी बुटी आणणे, आणि छातीफाडून रामदर्शन घडविणे अश्या प्रसंगातून  हनुमानाचा रामावरील स्नेह आणि भक्ती प्रतीत होते मात्र ह्या सुंदर नात्याला मैत्री म्हणून पहिल्यापेक्षा रामाचा दास म्हणून लोकांनी हनुमानाची ओळख ठेवली ह्याचे दुःख आहे. रामायणातील रावण आणि वाली ह्यांच्या मैत्रीबद्दलही काही उल्लेख येतात तर कुणी विभीषण आणि राम ह्यांनाही मित्र समजतात, शत्रूचा शत्रू तो आपला मित्र ह्या नियमात कदाचित राम आणि विभीषण ह्यांची मैत्री बसत असेल मात्र त्यात विषेश जिव्हाळा दिसत नाही. रामाचा राज्याभिषेक झाल्यावर पुन्हा विभीषण आणि राम ह्यांच्या भेटीला संदर्भ येत नाही. रामायणापेक्षा महाभारतामध्ये मैत्रीच्या नात्याला जास्त महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. कृष्ण आणि सुदामा यांच्या मैत्रीची सुरस आणि सुरम्य कथा आपण लहानपणापासून ऐकत आलेलो आहोत. ह्या कथेमध्ये मैत्रीच्या नात्यांमध्ये गरीब-श्रीमंत असा कोणताही भेद नसतो त्याचप्रमाणे मैत्रीमध्ये जेवढे तुमचे समर्पण असते जेवढी तुमची दानत असते त्याच्या कितीतरी पटीने मित्रत्वाचा त्याची उतराई होत असते याची जाणीव सुदाम्याच्या मूठभर पोह्याचे रूपांतर त्याच्या जीवनाचे सोने होण्याच्या कथेव्दारे होते. कृष्ण आणि अर्जुन ह्यांची मैत्री सुद्धा तितकीच विलोभनीय, कृष्णाची बहीण सुभद्रा हिचे हरण करून अर्जुनाचे तिच्याशी लग्न व्हावे ह्यासाठी कृष्णाने घेतलेली भूमिका ते अगदी शेवटच्या महत्वाच्या युद्धप्रसंगी  कृष्णाची यादवसेना की कृष्ण अशी निवड करायच्या प्रसंगी अर्जुनाने मैत्रीला प्राधान्य देत कृष्णाची साथ मागितली आणि भीष्म, जयद्रथ, कर्ण अश्या योद्ध्याच्या वधासाठी  कृष्णाची त्याला जी मदत झाली ती सर्वश्रुत आहे. मैत्री ही फक्त पुरुषी नाते आहे असे नव्हे हा संदेश देत द्रौपदी आणि कृष्णाची भावनिक मैत्री महाभारतात दिसून येते. बोटभर चिंधीच्या ऋणाची वस्त्रहरण प्रसंगी तिला वस्त्र पुरवून मैत्री जपणारा कृष्ण हा असा मित्र आहे की जो आधी पुढच्याची दानत आणि समर्पणवृत्ती तपासतो जसे



सुदाम्याकडे पोहे मागणे, अर्जुनाला यादव सेना की मी असा प्रश्न करून त्याच्या मैत्रीची परिसीमा तपासणे, द्रौपदीकडे कापलेले बोट घेऊन तिला चिंधी मागणे आणि तत्परतेने तिने भरजरी पदर फाडणे, दुर्वास आदी साधू परीक्षा म्हणून भोजन मागण्यासाठी आल्यावर आणि अक्षय अन्न पात्र धुवून ठेवल्यामुळे कोंडीत सापडलेल्या द्रौपदीला कृष्णाने भोजन मागणे आणि दोन भाताची शिते खाऊन तृप्तीचा ढेकर देणे आणि तो तृप्तीस्वर ऐकून साधूंनी निघून जाने. ह्या सर्व छोट्या छोट्या गोष्टीतून मैत्रीमध्ये समर्पणाशिवाय पूर्णत्व नाही तसेच मित्रत्वात परीक्षेचे अनेक लहानमोठे क्षण सतत येत असतात असे दिसून येते. महाभारतातील आणखी एक उल्लेखनीय मैत्री म्हणजे कर्ण आणि दुर्योधन यांची मैत्री होय. दुर्योधना कडून सहेतुक ठेवली गेलेली मैत्री कर्णाने जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत पळाली. अगदी आपण ज्यांच्याविरुद्ध लढतो आहोत ते आपलेच भाऊ आहेत हे झाल्यावरसुद्धा त्याने मित्राचा पक्ष सोडला नाही. मात्र चुकीच्या व्यक्तीसोबत मैत्री केल्य विद्या आणि सामर्थ्य ह्यांचे चीज न होता निव्वळ उपहास आणि पराभव मिळत जातो हे ही दुर्योधन आणि कर्ण ह्यांच्या मैत्री तून जाणून घेणे गरजेचे आहे असे वाटते .द्रौपदीचा भाऊ धृष्ट्द्युम्न आणि भीम ह्यांच्या मैत्रीचा उल्लेख अभावानेच येत असला तरी त्यांची मैत्रीसुद्धा फार दृढ होती. भीमाने अश्वत्थामा ह्या हत्तीला मारून द्रोणाचार्याचा पुत्र मेल्याची आवई उठवली, युधिष्ठिर ह्याने संभ्रमित उत्तर दिले तरी द्रोण शस्त्र टाकत नाही हे पाहून भीमाने त्याच्या वर्मी लागतील असे शब्द वापरले हताश होऊन शस्त्र ठेवलेल्या द्रोणाला भीमाचा इशारा समजून घेत धृष्ट्द्युम्नाने ठार केले असा उल्लेख इरावती कर्वे ह्यांच्या युगांत मध्ये सापडतो. द्रौपदीवरील निरामय प्रेम तिला किचकापासून वाचविणे, तिचा अपमान करणाऱ्या दुःशासन आणि दुर्योधन ह्यांना युद्धभूमीवर ठार करणे आणि धृष्ट्द्युम्न ह्यांच्याशी असलेली त्याची मैत्री ह्यामुळेच कदाचित द्रौपदी शेवटच्या क्षणी भीमाला पुढील जन्मी तू मोठा भाऊ हो तुझ्या छत्रछायेत आम्ही सुरक्षित राहू असे महत्वाचे वाक्य बोलते. हा भाग ह्या लेखानुषंगाने गौण आहे मात्र भीम आणि धृष्ट्द्युम्न हयांची मैत्री उल्लेखनीय आहे. ह्याच महाभारतात द्रोणाचार्य आणि राजा द्रुपद ह्यांच्या मैत्रीचे शत्रुत्वात होणाऱ्या रुपांतराची कथा आहे.त्यावरून मित्राने मित्राचा आणि मित्रत्वाचा सन्मान राखणे कसे आणि किती गरजेचे आहे हे आपल्या लक्षात येते. वरील सर्व बाबींचा विचार केला असता भारतीय संस्कृतीचे  दर्शन घडविणाऱ्या महाकाव्यात मैत्रीचे अनेक पैलू असलेले नाते सापडतात. मैत्री हे नाते पूर्वपार चालत आलेले आहे ह्यापुढेही चिरंतन राहणारे नाते आहे मैत्रीचे अनेक रंग आणि स्वरूप आपल्याला महाकाव्यात पाहायला मिळतात. त्यापासून योग्य बोध घेत मित्रत्वाची कास धरत आपलं जीवन आपण समृद्ध केलं पाहिजे हेच खरे.

# महाराष्ट्रातील "दारिद्र्याची शोधयात्रा"



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**अलीकडेच "दारिद्र्याची शोधयात्रा" हे हेरंब कुलकर्णी यांचे पुस्तक वाचण्यात आले. त्यांच्या ह्या पुस्तकातून पडद्याआडचा महाराष्ट्राच विदारक दर्शन घडल.वाचून  अस्वस्थ वाटलं. कारण ते सत्य आहे. काहीस भिषण, भयाणकही आहे. हेरंब कुलकर्णी हे व्यवसायाने शिक्षक आहेत. त्यांनी जवळजवळ पाच महिने रजा घेऊन महाराष्ट्रातील ग्रामीण भागात, खेड्यापाड्यात आणि त्या बाहेरही राहणाऱ्यांच्या जीवनाचा शोध घेतला. महाराष्ट्रातील बुलढाणा,यवतमाळ, वाशिम,उस्मानाबाद,हिंगोली,परभणी,लातूर, जालना,नांदेड, बीड,पालघर,चंद्रपूर,नंदुरबार,गडचिरोली, सांगली,सातारा,असे २४,जिल्हे.त्या जिल्ह्यातील गरिब तालुके,त्यातील गरिब गावे,त्या लगतच्या गरिब वस्त्या, पाडे,अशा १२५ ठिकाणी जाऊन, विट कामगार,उस तोड कामगार,दगडफोड कामगार, शेतमजूर शेतकरी,बेरोजगार तरुण,  यांच्या प्रत्यक्ष भेटी घेउन त्याच्या समस्यां जाणून घेतल्या.**


महाराष्ट्र राज्य निर्मितीला बासष्ट वर्षे पूर्ण झालीत. अनेक सरकार आलीत. विकासाच्या अनेकविध योजना राबविल्या गेल्यात. शिक्षण क्षेत्राचा विकास. विस्तार झाला. तरी पण अजूनही अनेक घटक असे आहेत, ते योजनांचे पासून, शिक्षणापासून वंचित आहेत. खूप दूर आहेत. दरडोई उत्पन्नात वाढ दिसत असली तरी दुसरीकडे देशातील एकूण गरिबांपैकी १० टक्के गरीब महाराष्ट्रात आहे. मुंबई, पुणे, नासिक, नागपूर, औरंगाबाद, अशी स्मार्ट शहरे आणि अशीच काही जिल्ह्यांची  शहरे,तालुके बघितली तर सगळीकडे झगमगाट आहे. मोठ्या प्रमाणात निधींची उपलब्धता होते. सर्व सुखसोयी आहेत. रस्ते, पाणी, वीज, अन्नधान्य, मनोरंजन, कशाचीही चिंता नाहीये. मॉलमध्ये गर्दी मावत नाहीये. प्रवासाची चिंता नाही. राजकिय नेत्यांच्या स्वागताला लाखो रुपये खर्च होत आहेत. ईथला विकास बघता हा आहे आपणा सर्वांना पडद्यावर दिसणारा महाराष्ट्र. पण-पडद्याआडचा ही एक महाराष्ट्र आहे. कसा आहे तो?

काय आहे गरिबी ? हे गरीब काय खातात. कसे रहातात ,त्यांच्या पातळीवर शिक्षणाची काय परिस्थिती आहे.त्यानां मिळणाऱ्या आरोग्य सुविधा कशा आहेत. रस्ते,पाणी,वीज, अन्नधान्य पुरवठा, गावपातळीवरील प्रशासन, त्यांचे त्यांना मिळणारे सहकार्य. कल्याणकारी योजनात होणारी अडवणूक. स्थलांतरित मजूर भटकेविमुक्त,असंघटित मजूर, शेती-आत्महत्या,दारु व्यसन,या बाबतीत त्या त्या भागातील लोकांशी प्रत्यक्ष चर्चा करुन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

त्या भागातल्या सामाजिक संस्था, जसे-श्रमजीवी संघटना -पालघर,श्रमिक एल्गार-चंद्रपूर,मेळघाटमित्र-चिखलदरा,स्वामिनी दारूबंदी -यवतमाळ अशा संस्थानाही भेटी देऊन त्यांचे सहकार्य मिळवले. अनिल अवचट, पी.साईनाथ,अनिल शिदोरे,अजित अभ्यंकर,आदींशी चर्चा करुन या अभ्यासासाठी सहकार्य लाभले.

कुळकर्णी यांच्या ह्या शोधयात्रेतून अनेक गोष्टी आपल्या समोर आल्या आहेत.अनेक योजना आहेत,जसे संजय गांधी निराधार,श्रावणबाळ,विधवा वेतन,अपंगासाठी सहाय्य योजना आहेत.त्याचा लाभ घेण्यासाठी लाच द्यावी लागते.बचत गट आहेत. पण बरेच गट सबसिडी मिळविण्यासाठी होते.काही महिलांनी गट स्थापन केले,गाई,म्हशी, घेतल्या.पण त्यांचे विमा न घेतल्याने जनावरे रोगराईत मृत झाल्यावर नुकसानभरपाई मिळाली नाही. योग्य मार्गदर्शन होत नाही.

महाराष्ट्रातील ह्या भेटी दिलेल्या भागात कल्याणकारी योजनात मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार आढळून आला.मराठवाडयात हे प्रमाण जास्त आढळले.वायरमनचे प्रशिक्षण घेतलेल्या तरुणाला मुद्रा लोनविषयी सांगितलं तो म्हणाला बँकेत असा आदेश आला नाही सांगितलं.  अनेक प्रकारच्या योजना येतात पण माहितीची टाळाटाळ




केली जाते. तरुण लाभापासून वंचीत रहातात.ग्रामीण भागात दारुचा प्रश्नही गंभीर वाटला.

वर्धा जिल्ह्यात तर चक्क चार आमदारांनीच दारुबंदी उठवण्याची मागणी केल्याच सत्य समोर आणलय.दारुबंदी कार्यकर्त्यांना मारहाण होते.निवडणूक काळात तरुणांना दारुच आमिष असत. त्यामुळे व्यसनाधिनता वाढली आहे.अनेक ठिकाणी शेतीकाम आटोपल्यावर काम नसते.त्यामुळे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होते. उसतोड,वीटकाम,दगडकाम, मजुरांचे स्थलांतर अधिक आहे. प्रत्येक ठिकाणचे काम संपल्यावर कामाच्या शोधात स्थलांतर अटळ आहे.शेवटी पोटासाठी फिरावेच लागते.हे सर्व लोक उपाशी रहात नसले तरी,त्यांच्या वाट्याला येणार अन्न सकस,पोषक तर नसतेच.जे जसे मिळेल त्यावर समाधान मानावेच लागते.अल्पशेती त्यावरच मजुरी.अशाश्वत उत्पन्न, आत्महत्या,हे भिषण समोर आल.गरिबी कमी करायची, निर्मूलन करायचं तर शेतीत सुधारणा करण्याचा पर्याय समोर आल्याचे निदर्शनास आले.नंदूरबार जिल्ह्यात अनेक गावात वीज नाही. १९९५ साली मनोहर जोशी मुख्यमंत्री असतांना तोरणमाळ भागात रस्त्याच दिलेल आश्वासन अद्यापही बावीस वर्षा नंतरही  पूर्ण झालेले नाही ही शोकांतिका आहे.

तीन हजार वस्तीच्या ठिकाणी दारु दुकान उघडता येते,हा सरकारी निर्णय आहे.पण आरोग्य केंद्र सुरु करायला पाच हजाराची अट आहे.अशा ठिकाणी आरोग्याची दैन्यावस्था आहे.नेमलेले डॉंक्टर,नर्स,अशा ठिकाणी फारसे जात नाही.ग्रामिण आरोग्य केंद्रात अनेक औषधी नसते.मुलांमध्ये कुपोषण आढळते.अशा अनेक गोष्टी समोर येतात.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शब्दांच्या गाभाऱ्यात : गाव संस्कृतीच्या गंधाने संस्कारीत झालेल्या कविता



भानुदास धोत्रे
संपर्क क्र : 7972625086

आधुनिक केसरी

**अलीकडील काळात मराठी काव्य प्रांतात मराठी कविता लिहिणारे अनेक कवी, कवयत्री उदयाला आलेले आहेत. त्यातही अत्यंत संवेदनशीलपणे लिहिणाऱ्यांचे प्रमाण हे नगण्यच असल्याचे जाणवते. जुन्नरस्थित पेशाने शिक्षिका असलेल्या श्रीमती सरिता म्हेत्रे-कलढोणे यांचा अलीकडेच "शब्दांच्या गाभाऱ्यात" हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला असून, त्यांच्या संवेदनशील मनाचे प्रतिबिंब त्यात प्रतिबिंबित झाल्याचे दिसून येते. बालवयापासूनच मनावर झालेले सुसंस्कृतपणाचे संस्कार, अल्पवयातच जबाबदारीचं आलेलं भान, सूक्ष्म निरीक्षणदृष्टी यामुळे योग्य शब्दांची पकड घेत त्यांच्या कविता सहजपणे कागदावर उमटतांना दिसतात. त्यात कुठलीही ओढाताण झाल्याचे जाणवत नाही. शब्दांशी सहज खेळण्याची हातोटी त्यांना चांगल्या प्रकारे लाभली आहे. "शब्दांच्या गाभाऱ्यात" या त्यांच्या काव्यसंग्रहातील कविता वाचत असतांना त्यांच्या कवितांची वर्गवारी आपोआप वाचकांचे लक्ष वेधून घेते.**


एकूणच त्यांच्या संबंध कवितेकडे तटस्थपणे पाहत असतांना त्यांच्या काही कवितांची वर्गवारी पुढीलप्रमाणे मांडता येईल.

सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या कविता -

हितगुज तुझं माझं, कुठे हरवला माणुसकीचा गाव, जाणीव, हरवलेली माणसे, दहावा रंग, संवाद, तत्त्वज्ञान, वंशाचा दिवा, पहाट, अवकाळी या सर्व कवितांमधून श्रीमती सरिता म्हेत्रे-कलढोणे यांनी सामाजिक आशय अत्यंत संवेदनशीलपणे शब्दबद्ध केला आहे. उदाहरणार्थ- भूकेला कुठे असतो जात अन् धर्म.
ना माहित असते पोथ्या पुराणातील तत्त्वज्ञान
अन्नाचा कण मोठा धर्म वाटतो.

आशावाद व्यक्त करणाऱ्या कविता-
माणूसकीचा जपूया गंध, गुलदस्ता, रस्ता, पाऊल, नूतन, ध्यास तू इत्यादी कवितांमधून जीवनाकडे पाहण्याचा एक आशावादी दृष्टिकोन त्यांच्या कवितांमधून प्रतीत होतो. उदाहरणार्थ-
फुलासारखा जन्म असावा गंध सौख्य देणारा दुसऱ्यासाठी फुलता
फुलता गुलदस्ता देवरूप होणारा

स्त्री विषयक जाणिवा प्रकट करणाऱ्या कविता - अंगारा, मनात दाटलेले, वाट पाहती सारे, माहेराहून परततांना, माय, बंधन, कुणीतरी असावं, जाणून घे,ती, स्वाभिमान, कोंदण इत्यादी कवितांमधून श्रीमती सरिता म्हेत्रे-कलढोणे यांनी स्त्रियांची सुखदु:खे, शिक्षणामुळे स्त्रियांना आलेलं भान, आधुनिक स्त्रीची नोकरी आणि संसार सांभाळताना होणारी ओढाताण, ससेहोलपट




उपरोक्त कवितांमधून मांडली आहे.

शेती मातीचे ऋण व्यक्त करणाऱ्या कविता - सरिता ताईंचं बालपण गाव खेड्यात गेल्यामुळे ग्राम संस्कृतीची पाळंमुळं त्यांच्यामध्ये घट्टपणे रुजली आहेत. नोकरीच्या निमित्ताने त्या जरी शहरांमध्ये स्थायिक झालेल्या असल्या तरी गावाकडील मातीची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नाही.

त्यांच्या पावलांची धूळ, नाळ मातीशी, मराठीमाती या कवितांमधून ते स्पष्टपणे प्रतीत होतं. उदाहरणार्थ-
माणिक मोत्याची रास भरली बाई शिगोशीग
सुगी चालली जोरदार कुणब्याची लगबग.

निसर्गपर कविता - पाऊस मनातला, ऋतू हिरवा, काया, देणं, नार इत्यादी त्यांच्या कवितांमधून निसर्गाप्रतीची अपार श्रद्धा दिसून येते.

प्रेम सुलभ भावना व्यक्त करणाऱ्या कविता - प्रेम हे तर सजीवांना लाभलेलं एक वरदान. प्रेमभावना ही मानवी नात्याला एकत्र गुंफून ठेवते बांधून ठेवते अशाच काही रचना सरितातार्इ यांनी उपरोक्त संग्रहात लिहिल्या आहेत त्या अशा- शोध, अबोल प्रेम माझे, भुरळ, गंध होता प्रीतीचा, प्रीत इत्यादी.

नातेसंबंध दर्शविणाऱ्या कविता- बापलेक, मैत्री, मायबाप वृक्षवल्ली इत्यादी कवितांमधून सरिता ताईंनी मानवी नातेसंबंधांमधील अनुबंध हळुवारपणे उलगडून दाखविले आहेत.

थोर माहात्म्याप्रति कृतज्ञता - क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री-शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. यामुळेच खऱ्या अर्थानं अनंत काळापासून कोनाड्यात खितपत पडलेली स्त्री शिक्षणाचे अमृत प्राशन करून पुढे आली आहे. म्हणून या थोर महत्म्याप्रतीची कृतज्ञता सरिता म्हेत्रे-कलढोणे यांनी सावित्री तू होतीस म्हणून, क्रांतीसुर्य ज्योतिबा आणि सावित्रीआई या कवितांमधून व्यक्त केली आहे.

विशेष उल्लेखनीय कविता - कृष्णसखा, पसायदान चष्मा, सैनिक, होळी होऊ दे इत्यादी त्यांच्या काही विशेष उल्लेखनीय कविता ही नोंद घेण्यासारख्या आहेत. पसायदान या कवितेत त्या लिहितात-
विझत चाललेल्या अस्ताला काजव्यांचा नाजूक उजेड दे
अंधार भेदून जाणाऱ्याला लखलखता तेजाळता प्रकाश दे अवघ्या
विश्वाला मिळाया सुखसमाधान
माऊलीसारखं मलाही पसायदान दे

एकंदरीत सरिता म्हेत्रे-कलढोणे यांच्या सर्वच कविता मानवी मनाला भुरळ घालणाऱ्या असून यापुढेही त्यांच्या काव्य प्रवासाची पाऊलवाट अधिकाधिक प्रशस्त होत जाऊन हमरस्त्यात रूपांतरित होणार असल्याची ग्वाही त्यांच्या लिखाणामधून स्पष्टपणे जाणवते. आपल्या यापुढील लेखन प्रवासास भरभरून शुभेच्छा!!

**पुस्तक : शब्दांच्या गाभाऱ्यात**
**कवयित्री : सरिता म्हेत्रे-कलढोणे**
**प्रकाशक : यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे**
**मुखपृष्ठ : अरविंद शेलार.**

# सेवानिवृत्ती शाप की वरदान!

आधुनिक केसरी

**ठरल्याप्रमाणे, म्हणजे अगदी सटवाईनं लिहून ठेवल्याप्रमाणे 58 व्या वर्षी तो रिटायर्ड झाला आणि त्याचं जगच बदललं. नोकरीत असतांना त्याची एक ठराविक दिनचर्या होती. सकाळी साडे नऊला तो घराबाहेर पडायचा. अत्यंत प्रामाणिकपणे ऑफिसच्या वेळांत नेमून दिलेलं काम आटपायचा. भाजी, किराणा सामान घेत, भेटलेल्या कुणाशी चर्चा करून रमत गमत घरी परतायला त्याला संध्याकाळचे सात वाजत आल्यावर जेवण, शतपावली वगैरे झालं की पलंगावर पडल्या बरोबर त्याचे डोळे मिटायला लागत.**

ऑफिसात सगळा स्टाफ त्याच्या वर खुश असायचा. त्याचा हसरा चेहरा बघायची संवय झालेले त्याचे सहकारी त्याच्या रिटायर्डमेंटच्या सभारंभाला खूप हळहळले, पण सरकारी नियमांपुढे सर्वांचाच नाईलाज होता. एरवी त्याचे दिवसभराचे कार्यक्रम इतके साचेबध्द होते की, सुटीच्या दिवशी घरांत त्याचा जीव घाबरायला लागायचा. दुपार खायला उठायची आणि करायला काहीच नाही म्हटल्यावर त्याचे पाय बायकोच्या हक्काच्या स्वैंपाकघराकडे वळायचे. मग ही बरणी उघड, तो डबा उचक, असे त्याचे उद्योग दुपारभर चालायचे. वामकुक्षी आटोपून बायको उठली की तिला विस्कटलेलं स्वैंपाकघर दिसे. आणि तिचा संताप होई. सुटीचा एक दिवसही हा माणूस घरांत नको, असं तिला वाटायला लागे.
त्यालाही अपराध्यासारखं होत असे, जितके व्यवस्थित आपण ऑफिसात असतो., तेवढं घरी रहाणं जमत नाही ,ही खंत त्याला पुढील आठवडाभर त्रास देई.
रिटायर्ड झाल्यापासून तो कायम घरांतच असायचा. तिला मात्र याचा त्रास व्हायचा. तिच्या हौशीचे दिवस कधीच सारून गेले होते आणि जेंव्हा हौस करायची वेळ होती ,तेंव्हा हा सतत ऑफिसचं तुणतुणं वाजवायचा, हे ती विसरली नव्हती, किंबहुना तिच्या मनांत याचा सुप्तसा रागही असावा.
गरजेपुरता पैसा घरांत येत असला की माणसांचं ओझं व्हायला लागतं. वर्षानुवर्षाच्या त्याच्या संवयी तिला आता त्रासदायक होऊ लागल्या, त्याच्याबद्दलच्या तिच्या तक्रारी वाढू लागल्या. त्याने स्नान केल्यावर ओला टॉवेल पलंगावर फेकायची त्याला संवय होती, तो ऑफिसात जायचा तेंव्हा ती कर्तव्य म्हणून तो ओला टॉवेल उचलून धुवायला घेत असे ,पण आता त्याला 'भरपूर वेळ असल्यानं असली कामं त्यानेच आपणहून करायला हवीत' असा तिचा आग्रह होता. हा आग्रह त्याला मान्यही होता, मात्र तिने सूचना चांगल्या शब्दांत द्याव्या, असा त्याचा सूर होता. तिच्या स्वभावामुळे कदाचित, तिला त्याची ही गोड बोलण्याची अपेक्षा पूर्ण करणं जमत नव्हतं. तो रिटायर्ड होऊन आरामाचं आयुष्य जगतोय आणि आपल्याला मरेपर्यंत रिटायर्ड होता येणार नाही ,ही जाणीव तिला बोचत असावी.
खरं तर तिचंही वय उताराला लागलं होतं आणि व्याप वाढत असल्याने तिची आता दमछाक होऊ लागली होती. मुलांची लग्न, सुनेशी जमवून घेतांना होत असलेली तारांबळ, तो घरीच असल्याने त्याचेकडे येणारी माणसं, आणि हे कमी का काय म्हणून चोवीस तास समोर वावरत असलेला, पण घरकामाला काडीचा हातभार न लावणारा तीचा हा स्थितप्रज्ञ नवरा.
तो समोर नसला की, त्याच्याबद्दलच्या असूयेनं आणि समोर असला की त्याचं तोंड बघूनच तिचं रक्त उसळायला लागायचं. तो पाणी प्यायला जरी स्वैंपाकघरात शिरला तरी 'तू मुद्दाम माझ्या मध्ये मध्ये लुडबुड करतोस' म्हणत ती त्याला झिडकारायची.
हळूहळू तिला तो डोळ्यासमोरही नकोसा होऊ लागला. आणि त्या दिवशी ती प्रचंड चिडली. कारण काय होतं कुणालाच कळलं नाही, तिलाही. पण इतक्या दिवसांचा मनांत साचलेल्या रागाचा स्फोट झाला आणि तिने त्याच्यावर खूप आरडा ओरडा केला. त्याला अद्वा तद्वा बोलली, थेट त्याच्या आई वडिलांचा, बहीण भावांचा उद्धार केला. तो हादरला, पण रिॲक्ट करण्याचा त्याचा स्वभाव नव्हता. तो तिला चिडायची कारणं विचारत राहिला. आणि ती प्रत्येक वेळी सांगत राहिली, 'तू मला आता डोळ्यासमोर नकोस, बस्!
त्याने ऐकलं आणि निराश होत विचारलं! 'आयुष्याच्या या स्टेजवर आता मी कुठे जाऊ?' तिला वाटलं हा चिडवतोय, ती मग आणखीनच चिडली. हातवारे करत किंचाळली! 'कुठेही जा. मेलास तर फारच बरं होईल, माझी सुटका तरी होईल.' हे ऐकून हा एकदमच शांत झाला. तश्याही परिस्थितीत म्हणाला, 'ते माझ्या हातात नाही, पण तुझा शाप माझ्या आतपर्यंत पोहोचला. तू मात्र खूप जग, माझं उरलेलं आयुष्य तुला मिळू दे. शतायुषी हो!
हे असं वारंवार होऊ लागलं. अगदी चिमुटभर कारणा साठीही ती त्याला मरणाचा शाप द्यायची आणि मोबदल्यात तो तिला शतायुषी होण्याचा आशीर्वाद द्यायचा.
तिच्या मनांत तसं काही नसायचं. त्याने खरंच त्यांच्या संसारातून, या जगातून कायमचं निघून जावं असं तिला वाटणं शक्यच नव्हतं. शेवटी तिनेही त्याचेबरोबर पस्तीस छत्तीस वर्ष संसार केला होता, त्याने बांधलेलं मंगळसूत्र तिने सन्मानाने मिरवलं होतं, वर्षानुवर्षे त्याचं आयुष्य वाढावं म्हणून वड पुजले होते, हरताळकेचे कडकडीत उपास घातले होते, त्याचा मृत्यू मागण्या इतकी ती खचितच दुष्ट नव्हती.
पण तिच्यासमोरचा त्याचा सतत होणारा वावर जाणवला की तिची विचार शक्ती संपूर्णपणे नष्ट व्हायची, मेंदू अक्षरशः पेट घ्यायचा आणि तिच्या तोंडातून नको ते शब्द बाहेर पडायचे आणि एक दिवस अचानकच तो गेला. सकाळी उठून त्याने चहा घेतला, लांब फिरून आला आणि 'थकवा वाटतोय' म्हणत सोफ्यावर आडवा झाला तो उठलाच नाही.
घरांत धावपळ झाली, डॉक्टर आले, त्यांनी तपासलं आणि त्यांच्या प्रथेनुसार इंग्रजीत 'सॉरी, ही इज नो मोअर' सांगितलं. एकच हलकल्लोळ झाला. तो मात्र त्याच्या स्वभावा प्रमाणेच एकदम शांत पहुडला होता. प्रत्येकजण त्याच्या वेदनारहित मृत्यूचा हेवा करीत होते. 'BEFORE TIME असं मरण नको होतं ,असा प्रत्येकाचाच सूर होता.
तिच्यासाठी मात्र लोक खूपच हळहळले 'आता कुठे सुखाचे दिवस आले होते, नवऱ्याचा पूर्णकाळ सहवास लाभला होता ,तर ही वेळ आली' असे लोक म्हणत होते . आकाशाकडे बोट दाखवून, 'त्याच्या इच्छेपुढे कुणाचं काय चालतयं का ?वगैरे बोलून तिचं औपचारिक सांत्वन करून लोक त्यांच्या निघून गेले.
आता ती एकटी राहिली. प्रेम, राग, विरोध, काळजी या मनातील भावना व्यक्त करायला हक्काचं कुणी उरलं नाही. तसं मुलं, सुना लक्ष द्यायचे तिच्याकडे, पण त्यांना त्यांचाही संसार होता.
तिनं देवळं धुंडाळली, मित्र मैत्रिणी झाले, काही काळ माहेरच्यांचं कौतुक झालं, मग मात्र सारेच आपोआप दूर झाले.
असेच दिवस जाऊ लागले, महिने गेले, वर्षे सरली. मुलांनी थाटात तिचा पंच्याहत्तरावा वाढदिवस साजरा केला. पण 'सतत तुझंच कौतुक कसं करायचं ?' म्हणत मग त्यांनीही अंतर राखायला सुरुवात केली.
नातू, नात लहान होते तोवर तिचे होते, मोठे झाल्यावर त्यांचं जग विस्तारलं, आजीचा पदरही न सोडणारी बाळं तिनं चारदा आवाज दिल्यानंतर एकदाच 'काय आहे आजी?' असं चिडक्या स्वरांत विचारू लागले. तिला हे त्रासदायक व्हायचं, नेमका तेंव्हाच, नवऱ्याशी केलेला व्यवहार आठवायचा, पण 'काळाला मागे नेऊन चूक सुधारता येत नाही' हे ठाऊक असल्याने, तिला नेमून दिलेल्या जागी पडलेला चेहरा घेऊन ती बसून रहायची.
तिच्या वयाचा आकडा वरवर जात राहिला, कार्यक्षमता मात्र दर दिवसाला कमी होत गेली. आता मात्र ती प्रचंड थकली, हातपाय चालणं कठीण झालं, वेळ काढणं जड जाऊ लागलं. 'तुझी उपयोगिता संपायला आलीय' याची जाणीव लोक आडून पाडून तीला करून देऊ लागले आणि नकळत ती मरणाची वाट बघायला लागली.
एव्हाना पन्नाशी ओलांडलेले मुलगा आणि सूनही थकायला लागले होते. त्यांनाही त्यांचे जावई सुना आल्या होत्या आणि नवी सून तिच्याच सासूचं काही करेना, तिच्याकडून आजेसासू साठी काही अपेक्षा करणं तर फारच कठीण होतं.
ती रोज आतल्या आत रडायची. 'देवा, उचल मला' म्हणून प्रार्थना करायची. 'भोग भोगायला मला एकटीला अश्या परिस्थितीत सोडून तो सुखासुखी निघून गेला' म्हणत मनातल्या मनांत त्याला दुषणं देत पडून रहायची. फारसं आठवायचं नाही तिला काही आज काल. मात्र तिने दिलेले शाप आणि त्याने दिलेले आशीर्वाद, प्रयत्न करूनही तिच्या स्मृतीतून निघत नव्हते....!
'मेलास तर फारच बरं होईल, माझी सुटका होईल.' हा तिनं त्याला दिलेला शाप होता की आशीर्वाद होता! 'तू मात्र खूप जग, शतायुषी हो,' हा त्याने तिला दिलेला आशीर्वाद होता का शाप होता की आशीर्वाद ? हे मात्र तिला तिचंच कळत नव्हतं....
मित्रांनो!
आपलेही बरेच मित्र सेवेतून निवृत्त झाले आहेत व काही निवृत्ती'च्या उबंरठ्यावर आहेत. एकमेकांना खूप जीव लावा आणि उर्वरित आयुष्य सुखाने जगा. सदरचा लेख कुणी लिहिला, माहित नाही. मात्र लेखकाने लिहीलेले प्रसंग कुणाच्या तरी आयुष्यात घडून गेलेले असावेत, असे जरी ग्रहित धरले तरी देखील, सदरची घटना सहजासहजी मान्य करावयास कुणाचेही मन तयार होणार नाही हे निश्चित. मात्र अशाही घटना कुणाच्या आयुष्यात सेवा निवृत्ती नंतर जर घडत असेल, तर हे फारच भयानक व हृदयद्रावक चित्र आहे.



# श्रावणमासी हर्ष मानसी....




कविता चव्हाण
संपर्क क्र. 9370062031

आधुनिक केसरी

**श्रावण महीना सुरु होऊन अवघे काहीच दिवस झालेत श्रावण महिना म्हटला म्हणजे व्रत वैकल्या, उपवास-तापास महिला वर्गाची तर नुसती धावपळ असते काही ठिकाणी असे बघायला मिळालेय की श्रावण महीना सुरु होण्याआधी महिलांची तयारी सुरु होते दोन महीने या कालावधित काही स्त्रिया पांच हजार वाती वळायला घेतात आणि श्रावण लागेपर्यंत त्या पूर्ण झाल्या पाहिजे असा त्या स्त्रियांचा संकल्प असतो आणि त्याच वाती श्रावणात रोज मंदिरात जाऊन दिवा लावायला वापरतात.**

श्रावणातील सोमवारचे फार महत्व आहे या महिन्यात महादेवाची विशेष पूजा केली जाते, सोमवारी दिवसभर उपवास करून महादेवाच्या मंदिरात जाऊन कैलेंडरवर बघून शिवमुठ जी असेल जसे, मुग, तांदुळ आणि दूध पाणी यांचा अभिषेक करून एकशेआठ बेलपत्र फुल वाहून पुजा केली जाते घरी येऊन शिवलीला अमृत पठण करतात याने मनोइच्छीत फल नक्की मिळते.

श्रावण सोमवारी शिवमंदिरात भविकांची दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी बघायला मिळते. श्रावणात पावसाची धार काही थांबत नाही सर्वीकडे हिरवळ पसरलेली असते नदी - नाले अगदी तुडुंब भरून वाहतात निसर्गरम्य ठिकाणी फिरायला जायचे तर श्रावणात जावे दुरून बघितल्यावर असे वाटते की जणु या डोंगरावर हिरवा शालू टाकलेला दिसतोय मातीचा तो दरवळणारा सुगंध अगदी मनाला मोहून जातो हा बरसणारा पाऊस नकळत ब-याच आठवणी देऊन जातो श्रावणातील पहिल्या रविवारी घरोघर कानूबाईचे आगमन होते खानदेशात कानूबाई उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो कानूबाई घरी येण्याआधी घराची पूर्ण साफसफाई केली जाते सड़ा, रांगोळ्या टाकल्या जातात डोक्यावर पाट घेऊन त्यावर कानूबाई ठेऊन जोडीने चालले जाते अश्या प्रकारे कानूबाईचे वाजत गाजत स्वागत केले जाते आदल्या दिवशी शनिवारी कानूबाई बसते त्या दिवशी भाजी भाकरीचा नैवद्य दाखवला जातो त्या दिवशी रात्रभर जागून कानूबाईची सेवा केली जाते कानूबाई समोर लावलेली ज्योत रात्रभर विझु नये म्हणून पूर्ण काळजी घेतली जाते, रात्रभर जागुन पुरणाचा स्वयंपाक केला जातो सकाळ होत नाही तोवर सूर्य उगवण्याआधी पूर्ण स्वयंपाक होऊन नैवद्य दाखवला गेला पाहिजे अशी प्रथा आहे आणि तो पूर्ण स्वयंपाक कुटुंबातील लोकच खातात. रविवारी संध्याकाळी वाजत गाजत कानूबाईची मिरवणूक काढली जाते त्यात स्त्रिया मुली डोक्यावर तुळशी वृन्दावन, कळस घेऊन चालतात नदीवर जाऊन कानूबाईचे मनोभावे पूजन करून विसर्जन करतात सण, उपवासाचा महीना म्हणजे श्रावण मास नंतर तिसऱ्या मंगळवारी घरोघर मंगळागौरीची स्थापना केली जाते तिला साज श्रृंगार घालून छप्पन भोगाचा नैवद्य तयार करून दाखवला जातो सर्व सुवासिनी नवनवीन पैठण्या घालून नटुन थटून छानपैकि मंगळागौरीची पूजा करतात गौरी समोर झिम्मा, फुगड्या खेळतात या महिन्याची सुवासिनी स्त्रिया आतुरतेने वाट बघतात कोणतीही पूजा गृहप्रवेशासाठी श्रावण हा उत्तम आहे श्रावणात सासरवाशीना माहेरी जायचे वेध लागतात रक्षाबंधन सणासाठी भाऊ बहिणीकडे येतो बहिण भावासाठी गोड- धोड करून त्याला खाऊ घालते भाऊ बहिणीला ओवाळणी म्हणून साडी आणतो गोकुळआष्टमी, हरतालिका, श्रावणात येतात बघता बघता गणपतिचे वेध लागतात. असा हा श्रावण महिना धार्मिक सणांची मंदीयाळी...



# पोह्याचा उपमा



सौ आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

आधुनिक केसरी

**अस्मादिक लग्न व्हायच्या आधी खुशाल चेंडू, वागणं बोलणं टॉमबॉय सारखं... दंगा धूडगुस, सतत गप्पा मारणे, हसणं, खिदळणंसारखे फुलपाखरी दिवस जगण्यात आनंद मानणारे.... बिचारी आई सतत मागे ....' अग पोरीच्या जातीला हे शोभत नाही... हे करून बघा, शिवण शिक, विणायला शिक, प्रत्येक पदार्थ हाताखालून गेला पाहिजे..." बाई इंदीरा गांधी झाली तरी स्वयंपाक करावाच लागतो"... उद्या नवऱ्याच्या घरी गेल्यावर माझा नक्की उद्धार होणार हिच्या मुळे.... कसं होणार हिचं! देवच पाठिराखा ! हे डायलॉग तिच्या तोंडातून पडले नाहीत असा एकही दिवस गेला नाही...**

लग्न करून परिचारकांच्या घरात आले ..... तेव्हा आईला भयंकर टेन्शन आलं..... मला अजिबात नाही. ... एकूण पस्तीस जणं घरात आजेसासुबाई, चार सासरे, तीन सासुबाई, चार जावा, पाच दिर, "अहो", दोन नणंदा त्यापैकी एकीचे लग्न होऊन सासरी गेलेली, घरात एकूण दहा मुले, गडीमाणसं पाचसहा जण..... एवढ्या मोठ्या कुटुंबात माप ओलांडून वाड्यात आले..... खुप काळजी घेणारे सगळे जण, प्रेमळ आजेसासुबाई, तिघी सासुबाई, जावा नणंदा दिर सगळं सगळे अगदी उखाण्यात नाव घेतो तसं सासर मिळालं हे आस्मादिकांचे भाग्यच! सगळ्याच गोष्टींचे कौतुक! एकदा बाबांनी म्हणजे सासऱ्यांनी फोडणीचे पोहे करायला सांगितले ...... हो आणते की करून मोठ्या फुशारकित सांगितलं ...... अंदाजे पोहे घेतले कांदा चिरला, मिरची चिरली, सगळी तयारी करून घेतली..... पोहे केले,..... पोह्याचा उपमाच झाला भिजवताना पाणी जास्त घातलं..... आता काय करायचं? बाबांना कसे द्यावेत? तसंच मनाचा हिय्या करून त्यांना प्लेटमध्ये घालून दिले..... त्यांच्या चेहऱ्याकडे बघितलं वा खूप छान झालेत हो पोहे! एकदम चविष्ट माझी मलाच लाज वाटायला लागली मला ...... बाबा पोहे कुठले? पोह्याचा उपमा झालाय ! असू दे त्यात काय पोहे काय किंवा उपमा काय एकूण चव छान असली की झालं त्या दिवशी ठरवलं.... परत पोहे कधीच बिघडले नाहीत..... त्यादिवशी पासून सगळे घरात मी विचारलं पोहे करू का की म्हणतात पोहेच कर उपमा नको.... असंच भाकरीच्या बाबतीतही झालं एकदा आमच्या स्वयंपाकीणबाई कमलबाई त्यांचा आयत्यावेळी निरोप आला मला बरं नाहीये मी काही आज येत नाही...... संध्याकाळचे सात वाजले होते नऊ वाजता सगळेजण जेवायला बसणार.... मी अगदी हिरीरीने म्हणलं मी आज भाकरी करते...... सगळ्या म्हणाल्या बर कर नाही जमलं तर आम्ही आहोतच की.... पंधरा-सोळा भाकरी केल्या एक जाड, एक पातळ, एक आफळलेली, एक करपलेली, एकीच्या कडा हसलेल्या, एक दोनच फुगलेल्या...... आई असती तर म्हणाली असती " अगं काय हे ! भाकरी काय ? उतरून टाकायला केल्यात का काय ?...... पण शप्पथ सांगते सगळ्यात मोठे सासरे ८० वर्षाचे होते. ते म्हणाले







आज भाकरी कोणी केल्या? तेव्हा एवढा मोठा पोटात गोळा आला ...... आरतीने केल्यात भाकरी !....अण्णा एकही शब्द बोलले नाही..... जेवण झाल्यावर म्हणाले जमतील पुढच्यावेळी...... असं म्हणल्यावर माझ्या डोळ्यात पाणी आलं ..... भाकरी बद्दल एकही चकार शब्द कोणीही बोललं नाही ..... करपलेली, वातड, तुटलेली,जाड अश्या भाकरी पण कुणीच नाव ठेवली नाहीत....... तेव्हाच ठरवलं भाकरी चांगलीच करायची ...... आता भाकरी टम्म फुगलेल्या, खरपूस भाजलेल्या आणि गोल गरगरीत, पातळ पापडा सुटलेल्या होतात. .... चूका करत करत... नवनवीन पदार्थ प्रयोग,करत " आता मात्र बरेच पदार्थ बरे जमतात..... आपल्या ग्रुपवर कम्फर्ट फूड संकल्पना सुरू आहे. आधीच पदार्थ लिहीण्यामुळेच ह्या ग्रुपमध्ये येता आलं..... पदार्थ करणं ,लिहीणं हाच मुळी कम्फर्ट झोन.... त्यामुळे मग काय मज्जा आली..... तुम्ही म्हणाल किती ते स्वतःचे कौतुक! पण आता सगळेच पदार्थ, रेसिपी कम्फर्ट झोनमध्येच आहेत...... म्हणून हा लेखप्रपंच !!

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
DC दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-
पाने ५३४
श्रीमती छायाताई खेडकर
8888780568
उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
पाने ३६४
श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712
गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415
दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# सायकलवाली आई

आधुनिक केसरी

तिला मी गेली चार वर्षे रोजच पहातेय ... ओळख अशी खास नाही पण ' ती ' साऱ्यांच्या उत्सुकतेचा केंद्रबिंदू! आम्ही सगळ्या आपापल्या मुलांना शाळेत सोडायला-आणायला जाणाऱ्या आई गँगमध्ये ' ती ' एकदम वेगळी ... एकमेव सायकलवर येणारी आई.
आजकाल STATUS SYMBOL म्हणून भारीचे ब्रँडेड कपडे घालून सायकल चालविण्याचे फॅड बोकाळले आहे ... ही त्यापैकी नव्हे. 'सायकल चालविणे,' हा कदाचित तिचा नाईलाज असावा. आमच्या स्कूटी किंवा कारमधून येणाऱ्या पोरांना हे अनपेक्षित होतं. कुणाकडे गाडी नसते किंवा TV / FRIDGE नसतो, हे त्यांना पटतच नाही.
ती सावळी आरस्पानी... आनंद, समाधान ,आत्मविश्वासाने अक्षरशः ओथंबलेली.... साधीशी सिंथेटिक फुलांची साडी असायची.
गळ्यात चार मणी, हातात दोनच काचेच्या बांगड्या.
माझ्या गाडीच्या शेजारीच तिची सायकल पार्क करायची.
मागच्या सीटवर तिचा मुलगा ....
त्याला सायकलचे कॅरीयर टोचू नये, म्हणून, मस्त मऊ ब्लँकेटची घडी घातलेली.... लहान असतांना ती त्याला पाठीशी बांधून आणत असे.
लेक नीटनेटका ... स्वच्छ कपडे ... बूटांना पॉलिश.
तो पार वर्गात पोचेपर्यंत ती अनिमिष नेत्रांनी पहात असायची .... जणू त्याचं शाळेत जाणं ती अनुभवतेय ... जगतेय.
हळूहळू काहीबाही कळायचं तिच्या बद्दल....!
ती पोळ्या करायची लोकांकडे... फारतर दहावी शिकलेली असावी. नवरा हयात होता, की नव्हता ,कोण जाणे...? पण,ती तिच्या आईसोबत राहायची असे कळले . RTE ( RIGHT TO EDUCATION ) कोट्यातून तिच्या मुलाची ADMISSION झालीये एव्हढीच काय ती माहिती मिळाली.
एकदा माझ्या लेकीचा कुठल्याश्या स्पर्धेत दुसरा क्रमांक आला. तिला मी यथेच्छ झापत असतांना , पार्किंग मध्ये सायकलवालीचा लेक दिसताच माझी कन्यका किंचाळली ...
"अग तो बघ तो!
तो FIRST आला ना,
SO मी SECOND आले ..."
आणि मोठ्यांदा भोकाड पसरलं.
मी त्याची PAPER SHEET पाहिली ...
मोत्यासारखं सुंदर अक्षर ...!
अभावितपणे माझ्या लेकीला दाखवत म्हणाले ,
" बघ बघ ... याला म्हणतात अक्षर ! किती मेहनत घेते मी तुझ्यासाठी .. आणि तू ??? "
माझे डोळे संताप ओकत होते.
त्याची आई शांतपणे म्हणाली ,
" कुणीतरी दुसरं पहिलं आलंय म्हणून, तुमची लेक दुसरी आल्याचा आनंद तुम्ही गमवताय ना! "
..... सणसणीत चपराक.
मी निरुत्तर.
मी खोचकपणे विचारलं,
"कोणत्या क्लासला पाठवता याला?"
ती म्हणाली,
" मी घरीच घेते करून मला जमेल तसं... ..! मुलांना नेमकं काय शिकवतात, ते कळायला हवे ना, आपल्याला. " तेव्हाच



कळलं 'हे रसायन काहीतरी वेगळंच आहे!'
हळूहळू ,तिच्याबद्दल माहिती कधी मिळू लागली, तर कधी मीच मिळवू लागले.
ती पाथर्डी गावातून यायची.... सकाळी सात तर संध्याकाळी आठ अश्या एकूण पंधरा घरी पोळ्या करायची. तिने स्वतः एका TEACHER कडे क्लास लावला होता ..बदल्यात ती त्यांच्या पोळ्यांचे पैसे घेत नसे. मी नतमस्तक झाले. मनोमन तिच्या जिद्दीला आणि मातृत्वाला सलाम केला .
पहिल्या वर्गाचा RESULT होता. ती खूपच आनंदात दिसली. चेहऱ्यावर भाव जणू पाच तोळ्याच्या पाटल्या केल्या असाव्यात .. मी अभिनंदन केले ... तेव्हा भरभरून म्हणाली. ....
" टिचरने खूप कौतुक केले त्याचं ! फार सुंदर पेपर लिहिलेत, म्हणाल्या..फक्त थोडे बोलता येत नाहीत म्हणाल्या . त्याच्याशी घरी इंग्रजीत बोल म्हणाल्या. " मी तिचं बोलणं मनापासून ऐकू लागले ...
" छोट्या गावात वाढले ताई.. वडील लहानपणी गेले ... अकरावीत असताना मामाने लग्न लावले... शिकायचं राहूनच गेलं .. फार इच्छा होती हो ! "... डोळ्यात पाणी प्रयासाने रोखून म्हणाली... " आता याची आई म्हणून कुठेच कमी पडणार नाही मी... एका TEACHER शी बोलणं झालंय ,त्या मला इंग्रजी बोलायला शिकवणार म्हणाल्यात .... बारावीचा फॉर्म भरलाय ... उद्या याला मोठा झाल्यावर कमी शिकलेली आई म्हणून लाज वाटायला नको ." म्हणत खळखळून हसलीं. त्याला आज पोटभर पाणीपुरी खाऊ घालणार असल्याचे सांगून, ती निघाली.
मुलांना रेसचा घोडा समजणारी "रेस कोर्स मम्मा", सकाळी सातच्या शाळेलाही मुलांना सोडताना नुकतीच पार्लर मधून आलेली वाटणारी "मेकअप मम्मा" , दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर केवळ बारीक होण्यावर बोलणारी, "फिटनेस मम्मा " स्वतः पोस्ट ग्रॅज्युएट असूनही, नर्सरीतच मुलांना हजारो रुपयांचे क्लासेस लावून मला कसा याचा अभ्यास घ्यायला वेळ नाही हे सांगणारी "बिझी मम्मा" किंवा मुले ALLROUNDER होण्यासाठी त्यांना मी कशी हिरा बनवून तासते हे सांगणारी " जोहरी मम्मा " ... ह्या आणि अश्याच अनेक मम्मी रोज भेटतात मला.........या मम्मी आणि मॉमच्या जंगलात आज खूप दिवसांनी मला एक " आई " भेटली. अशी आई ,जी एक स्त्री म्हणून,.... माणूस म्हणून... आणि एक आई म्हणून खूप खंबीर आहे... कणखर आहे. *फारच थोड्या नशीबवान स्त्रिया असतात ,ज्यांना जिजाऊ आणि सावित्रीबाई खऱ्या अर्थाने कळतात...! सायकलवाली आई त्यातलीच एक .....

यशश्री रहाळकर

# अशी लावा वाचनाची सवय...

आधुनिक केसरी

विद्यार्थी मित्रहो शाळा भरुन आता जवळपास दीड महिना होऊन गेला आहे. शालेय कामकाज नियमितपणे सुरू असून तुमचे शिक्षक तुम्हाला नियोजनानुसार अध्यापन करीत आहेत. अध्ययन अध्यापनानंतर तुम्हाला गृहपाठ म्हणजे घरी करण्यासाठी अभ्यास दिला जातो. यात बहुतांश वाचन व लेखी भाग असतो. या गृहपाठातील लेखी अभ्यास वहीत लिहून झाला की आपल्याला वाटते. माझा अभ्यास पूर्ण झाला. परंतु मुलांनो या लेखी अभ्यासाबरोबर आपल्याला रोज नियमितपणे वाचन करणे खूप गरजेचे असते.
आपल्या पाठ्यपुस्तकात अभ्यासासाठी जे पाठ दिलेले असतात त्यातील एक दोन पाठांचे रोज वाचन केले तर त्या पाठाचा आशय तुमच्या लक्षात राहतो.परीक्षेच्या काळात तुम्हाला जास्त ताण येण्याची शक्यता नसते.



१. पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त तुमच्या घरी गोष्टींची पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे येत असतात.
२. गोष्टींची पुस्तके वाचल्याने आपल्या ज्ञानात भर पडते. आपला शब्दसंग्रह वाढतो.
३. संभाषण करताना अथवा लेखी काम करताना या शब्दांचा आपल्याला खूप फायदा होतो.
४. वर्तमानपत्रातील तुम्हाला आवश्यक तो मजकूर तुम्ही वाचला पाहिजे. काही बातम्या, सुविचार, बोधकथा तसेच आपल्या सामान्य ज्ञानात भर घालणारी माहिती वाचाल्याने आपले ज्ञान वृद्धींगत होते.
५. वाचनाने आत्मविश्वास वाढीस लागतो. वाढलेला आत्मविश्वास आपल्याला अभ्यासास बळ देतो.
६. वाचनाने आपली शैक्षणिक प्रगती चांगली होते. यासाठी आपल्याला वाचनाची सवय लागणे अत्यंत आवश्यक आहे.
७. वाचनाने तुमचे व्यक्तिमत्त्व विकसित होते.
८. रोज वाचन केल्याने तुमचे मन संस्कारीत होते.
९. तुम्हाला आनंदाची अनुभूती प्राप्त होते.
१०. तुम्ही चारचौघांत आत्मविश्वासाने वावरु शकता.
११. वाचनानेच माणूस ज्ञानी बनतो.
१२. तुम्हालाही जर ज्ञानी बनयाचे असेल तर लहानपणापासूनच तुम्हाला वाचनाचा छंद जडला पाहिजे.
१३. तुम्ही निश्चय करा.दिवसभरात काही झाले तरी मी वेळ काढून माझ्याकडे असणाऱ्या पुस्तकातील काही पाने वाचणारच.
१४. कितीही अडचणी आल्या तरी वाचनात खंड पडू देऊ नका.
तुमच्या मनाने केलेला तुमचा हा निश्चय एक दिवस तुम्हाला नक्कीच समृद्ध करेन. एवढे प्रचंड सामर्थ्य वाचनात आहे.

लक्ष्मण जगताप

## भाज्यांचे भांडण

टोपलीत भाज्यांची
गर्दी झाली खूप
आपसात त्यांची जुंपली
बसेना कुणीच चूप

नाजूक टोमॅटोला
काटे बुडवी वांगे
मी किती धाडसी
हे सर्वांना सांगे

दुधी भोपळ्याने
व्यापली सारी जागा
पत्ताकोबिच्या भाराने
पडवळ करी त्रागा

हिरव्या मिरचिची
वचक होती भारी
तिखट चविमुळे
घाबरायची तिला सारी

कडू कारल्याला चिडवी
पांढरा लांब मुळा
फणसाला घाबरायचा
बिचारा दोडका भोळा

खोड्या करू लागले
आलं व लसूण
रागावलेल्या बटाट्याने
काढले त्यांना ठेचून

- रवींद्र व्ही. चालीकवार
महागाव, जि. यवतमाळ
मो. 9011559106

## चला मुलांनो...!

चला मुलांनो शाळेमध्ये
परीसरात झाडे लावू,
रोज खतपाणी देऊन
वृक्ष हे जोमने वाढवू.

चला मुलांनो गच्चीवर
बागबगीचा हा लावूया,
कोरपड- तुळस आघाडा
या वनौषधी रुजवूया.

चला मुलांनो सभोवती
गुलाब-मोगरा लावूया,
मन प्रसन्न करण्यास
फुलांचे झाडे फुलवूया.

चला मुलांनो बांधावर
गोड फळझाडे लावूया,
नारळ-फणस, जांभुळ
या झाडांना पाणी देऊया.

चला मुलांनो शेतामध्ये
झाडांचे रोपे रूजवू या,
चिंच-वड, आंबा लावून
निसर्ग हिरवा करू या...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४

## बिटिया रानी...

जब से घर मे आई बिटिया
खेल खिलोने लाई बिटिया

चुन मून, बंदर, हाथी, गुड़िया
सब को मिठा खिलाई बिटिया

चाबी दे कर भालू नाचे
छन छन नाच नचाई बिटिया

मम्मी जो भी काम करें कुछ
चुन चुन कर हाथ बटाई बिटिया

दादा जी घर से जब निकले
टा टा कर दोहराई बिटिया

घोड़ा बनकर चलता भैया
टिक टिक कर दौड़ाई बिटिया

झगड़ा कर हम मुंह लटकाएं
हंसकर बात बनाई बिटिया

-बलराज संघई...
संपर्क क्र. 9420015108





# पाच मूर्ख

अकबर बिरबल सभेत बसून गोष्टी करत होते. तेव्हाचं अकबर म्हणाला मला या राज्यातील 5 मूर्ख शोधून दाखवं. राजाचा आदेश ऐकून बिरबलाने शोध सुरू केला. एका महिन्यानंतर बिरबल दोन लोकांना घेऊन परतला तर अकबर म्हणाला, मी तर तुला 5 मूर्ख आण्यासाठी सांगितले होते आणि तू फक्त दोनचं घेऊन आला.
पहिला मूर्खः यावर बिरबल म्हणाला, सम्राट! हा पहिला मूर्ख आहे. मी याला बैलगाडीवर बसून जड बॅगचं ओझं डोक्यावर घेताना पाहिले. कारण विचारल्यावर हा म्हणाला की बैलाला जास्त ओझं नको म्हणून मी ते डोक्यावर घेतलं आहे. या प्रकारे हा पहिला मूर्ख आहे.
दुसरा मूर्खः हा दुसरा मूर्ख जो आपल्या म्हशीला गवत खिलवण्यासाठी गच्चीवर घेऊन जातो. कारण विचारल्यावर म्हणाला की गच्चीवर गवत उगते म्हणून मी म्हशीला वरती नेतो. हा माणूस गच्चीवरील गवत कापून फेकू शकत नाही आणि म्हशीला वर घेऊन जातो म्हणजेच की हा दुसरा मूर्ख आहेत.
तिसरा मूर्खः सम्राट! आपल्या राज्यात इतके काम आहे, पूर्ण राज्याची नीती मला संभालायची आहे. असे असूनही मी या मूर्खांना शोधण्यासाठी एक महिना वाया घालवला म्हणून तिसरा मूर्ख मीच आहे.
चौथा मूर्खः सम्राट! पूर्ण राज्याची जबाबदारी आपल्यावर आहे. सुपीक डोके असणार्‍यांकडून आपण कामाची अपेक्षा ठेवू शकतो आणि मूर्ख लोकं आमच्यासाठी मुळीच कामाचे नाही तरीही आपण मूर्खांच्या शोधात आहे या अर्थी आपण चौथे मूर्ख आहात.
पाचवा मूर्खः सम्राट! आता मी सांगू इच्छित आहोत की सगळ्यांना इतके काम आहेत. आपआपल्या नोकरी-धंध्यातील इतके महत्त्वाचे काम सोडून जो हा किस्सा वाचत आहे आणि पाचवा मूर्ख कोण हे माहीत करण्यासाठी अजून ही वाचतोय तोच पाचवा मूर्ख आहेत.




# आपेगावमध्ये युवक उमेदवारांना मतदारांची पसंती

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील आपेगाव ग्रामपंचायत निवडणूकीत मतदारानी प्रस्थापितांना डावलून अनेक ठिकाणी युवकांना मतदारांनी पसंती दिली आहे. या निवडणुकीत अनेक दिग्गजांना पराभवाचे धक्के बसले आहेत. माजी मंत्री संदीपान भुमरे यांचे खंदे समर्थक पोपट औटे यानी आपेगाव ग्रामपंचायत निवडणूकीत प्रस्थापिताना धक्का देत तिसर्या पिढीत पुन्हा ग्रामपंचायत ताब्यात घेण्यात यश मिळवले आहे.

तालुक्यातील लक्ष लागुन असलेल्या आपेगाव ग्रामपंचायत निवडणुकीचा तापलेला प्रचार आज निकालानंतर पूर्णपणे थंडावला असला तरी विजयाचा जल्लोष व पराजयाची सल इथून पुढे कायमपणे पाच वर्ष प्रत्येक राजकीय पक्षाच्या उमेदवारांबरोबरच कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या मनात घर करून राहणार आहे. आज लागलेल्या निकालात आपेगावच्या प्रस्थापिताना धक्का देत शिवाजी नागरी बँकेचे जेष्ट संचालक भाऊसाहेब पा.औटे (नाना) यांच्या मार्गदर्शनाखाली स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हा अध्यक्ष ज्ञानदेव मुळे, ज्ञानेश्वर औटे, (मालक) गफ्फार पटेल, जिजा प्रव्हाणे, विष्णू काळे सह शिवसेनेचे माजी पंचायत समिती सदस्य, तथा माजी उपसरपंच पोपट औटे यांनी विठु माऊली



ग्रामविकास पँनलच्या माध्यमातून ज्ञानराज ग्रामविकास पँनलला पराभूत करून आपेगाव ग्रामपंचायत मध्ये आठ एक ने संपूर्ण उमेदवार निवडून आणत आपेगावच्या प्रस्थापित दोन माजी सभापती, कारखान्याचे माजी संचालक, आपेगाव ग्रामपंचायत मध्ये गेल्या पन्नास वर्षांपासून प्रस्थापिताना धक्का देत निवडणूक जिकुंन आपेगाव ग्रामपंचायत वर पोपट औटे यांनी आपला विजयी झेंडा फडकावून सत्तेची मोहोर उमटविली आहे.

या विजयी उमेदवाराचे विलासबापु भुमरे यानी शहरात सत्कार केला. आपेगावच्या ग्रामस्थांनी मतदानातून प्रस्थापिताना धक्का देत पोपट औटे यांना साथ देत त्यांच्या हाती सत्तेच्या चाव्या दिल्या आहेत.

**आपेगाव ग्रामपंचायत विजयी उमेदवार**

**वार्ड क्र.१**
१) वैजिनाथ लक्ष्मण औटे
२) वसिम गफ्फार पटेल
३) वैशाली पांडुरंग औटे

**वार्ड क्र.२**
१) पांडुरंग कल्याण औटे
२) सौ.शोभाबाई आबासाहेब औटे
३) राधाबाई भगवान कोल्हे

**वार्ड क्र. ३**
१) सोमनाथ रावसाहेब औटे
२) केसरबाई बनाजी औटे

**आपेगावमधून पती-पत्नी दोघेही विजयी....**

आपेगाव ग्रामपंचायत मधे प्रथमच पती पत्नी विजयी झाल्याने तालुक्यात चर्चेचा विषय ठरला असुन पंचायत समितीच्या माजी सदस्या वैशाली पांडुरंग औटे व ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच पाडुरंग कल्याण औटे हे पती पत्नी विठु माऊली ग्राम विकास पँनलमधून विजयी झाले आहेत.

# जिल्ह्यात सर्वदूर पावसाचे थैमान

## कित्येक प्रकल्प काठोकाठ तर कुठे ढगफुटीने दाणादाण!

आधुनिक केसरी न्यूज

**बुलडाणा :** जिल्ह्यात घाटावरील तालुक्यात गत काही दिवसांत पावसाचे थैमान सुरू असून मोठमोठे जलाशयासह मध्यम, लघु प्रकल्प काठोकाठ भरले आहेत. भरीस भर ढगफुटी झाल्याने दाणादाण झाली आहे.

देऊळगाव राजा तालुक्यातील देऊळगावमही येथील खडकपूर्णा प्रकल्प ८५ टक्के भरला असून, पाण्याची मोठी आवक पाहाता, लवकरच हा प्रकल्प पूर्णक्षमतेने भरणार आहे. या धरणाच्या पाणलोट श्रेत्रात काल परवा ढगफुटीसदृश पाऊस झाला होता. नंतरही जोरदार पाऊस सुरुच होता. त्यामुळे हे धरण लवकरच पूर्णक्षमतेने भरणार असून, त्यामुळे या प्रकल्पातून तीन वक्री दरवाजे उघडून पाणी सोडण्यात आले. परिणामी, नदीकाठच्या गावांनी सतर्क रहावे, असा इशारा खडकपूर्णाच्या पूरनियंत्रण कक्षाने दिला आहे. या धरणाची पाणीपातळी ५२० मीटर इतकी असता त्यात झपाट्याने वाढ सुरु होती.

यापुर्वी चिखली तालुक्यातील मिसाळवाडी हा लघुप्रकल्प पूर्णक्षमतेने भरला असून खडकपूर्णा हा मोठा प्रकल्पही पूर्णक्षमतेने भरत आला आहे. धरणाच्या पाणलोटात सुरु असलेला जोरदार पाऊस व मोठ्या प्रमाणात होत असलेली पाण्याची आवक पाहाता, खडकपूर्णा धरणाचे तीन वक्री दरवाजे उघडण्यात येऊन नदीत पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा खडकपूर्णा प्रकल्पाच्या पूरनियंत्रण कक्षाने दिला आहे.

काल परवा मेरा खुर्द महसूल मंडळातील मिसाळवाडी, पिंपळवाडी, शेळगाव आटोळ परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने, नदी-नाल्यांना पूर आला होता. नदीकाठच्या गावांत व शेतात पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतीपिकांची अतोनात हानी झाली असून, या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, अशी मागणी परिसरातील शेतकरी वर्गाकडून केली जात आहे. अशा वेळी कवी नजीम खान यांच्या ओळी आठवतात...

**खोल दुःखाचीच वाणी मागतो,**
**आज ढग डोळ्यास पाणी मागतो.**



# सोयगाव तालुक्यात बोगस निराधारांची तहसीलकडून शोध मोहिम

## निराधार, वयोवृद्ध यांचा पगार बंद होऊ नये म्हणून कागदपत्रे काढण्यासाठी धावपळ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील वयोवृद्ध,निराधारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेणाऱ्या बोगस लाभार्थी असतील याच्यांकरीता आता शोध मोहिम चालू करण्यात आली आहे. सोयगावचे तहसीलदार रमेश जसवंत यांनी हाती घेतली आहे. त्यांनी तालुक्यातील ८ हजार ४०५ लाभार्थ्यांना पुरावे सादर करण्याबाबत नोटीसा बजविल्या आहे.

शासनाच्या संजय गांधी, श्रावण बाळ, विधवा परितक्त्या योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना इंदीरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना राबवित स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असणाऱ्या अशा निराधार व्यक्तींना या योजनेतून आर्थिक साहाय्य देण्यात येत असते. परंतू काही नागरिक बोगस दस्तावेज दाखल करून या योजनांचा लाभ घेत असल्याचा संशय आहे. त्या आधारे प्र.क्र.विसायो २०१८ प्रकरण क्रमांक.६२/ता २०/०८/२०१५ व शासन निर्णय प्र.क.विसावो येत आहे. २०२०-प्र.क्र१००/०३/०५/२०२१ वरील योजनेत अनुदान दिले जाते. अशा समस्त सोयगाव तालुक्यात ८४०५ लाभाच्यांना तहसीलदार रमेश जसवंत यांनी कर्मचाऱ्यांमार्फत नोटीसा बजावल्या आहेत.

नवीन शासन निर्णयानुसार योग्य पात्र लाभार्थ्यांनी त्यात प्रमाणपत्र, आधारकार्ड, उत्पन्न प्रमाणपत्र, दारिद्र्यरेषा प्रमाणपत्र, मुळ तपासणीसाठी अपंगत्वाचे प्रमाणपत्र संबधीत कार्यालयाच्या विभागात समक्ष हजर राहून सादर



करण्याची सूचना नोटीसातून करण्यात आली आहे. नोटीसा प्राप्त झालेल्या पासून सावळदबारा परिसरातील गरजू लाभाच्यांमध्येच झोपच उडाली आहे. लाभ कायम सुरू रहावा शासन निर्णय म्हणून आपले सरकार केंद्र टिटवी या केंद्राबाहेर विविध प्रमाणपत्रे काढण्यासाठी निराधार व वयोवृद्ध यांची गर्दी दिसून येत आहे, अशी माहिती सुनील माकोंडे यांनी दिली आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट



महावीर घर संसार



- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118, राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142, 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308, 9657398232
घाऊक चौकशी 7620111118, 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद